www.lokrakshanay.com ■ epaper.lokrakshanay.com ■ dainiklokrakshanay@gmail.com ■ @dainiklokrakshanay ■ +91 97023 86118

RNI. REG. NO. MAHBIL/2023/86118
लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ
सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ

# दैनिक लोकरक्षणाय

ठाणे । शुक्रवार, ०५ जून २०२६ । वर्ष ०४ । अंक ६५ । पृष्ठे ०८ । मूल्य २ रूपये

पहलाज निहलानी यांचे निधन



पान ६ वर

# केरळमध्ये मान्सून दाखल

● मुंबई, सुचित शिंदे :

उकाड्याने त्रस्त झालेल्या मुंबईकरांसाठी दिलासादायक बातमी आहे. नैऋत्य मोसमी वाऱ्यांचे गुरुवारी केरळमध्ये अधिकृत आगमन झाले आहे. केरळमध्ये मान्सूनचे आगमन झाल्याने आता मुंबईकरांसह राज्यातील सामान्य नागरिकांच्या अन् बळीराजाच्या नजरा त्याच्या पुढील प्रवासाकडे लागल्या आहेत.



**मुंबईत मान्सून कधी दाखल होणार?**

साधारणपणे मान्सून १ जूनच्या आसपास केरळमध्ये पोहोचतो. मात्र यंदा केरळमध्ये त्याचे आगमन सुमारे तीन दिवस उशिराने झाले आहे. केरळमध्ये मान्सून दाखल झाल्यानंतर त्याची पुढील वाटचाल सामान्य राहिल्यास १४ जूनच्या सुमारास मुंबईत मान्सूनचे आगमन होण्याची शक्यता आहे, अशी माहिती भारतीय हवामान विभागाच्या मुंबई प्रादेशिक केंद्राचे संचालक बिक्रम सिंग यांनी दिली.

साधारणपणे मुंबईत मान्सून दाखल होण्याची अधिकृत तारीख ११ जून असते. मात्र, १ जून रोजी केरळमध्ये मान्सून आल्यानंतर मुंबईपर्यंत पोहोचण्यासाठी त्याला सुमारे १० दिवसांचा काळ लागतो, त्यामुळे यंदा १४ जूनपर्यंत मान्सून मुंबईत धडकेल, असा अंदाज सिंग यांनी वर्तवला.सध्या दक्षिण भारतात मान्सूनच्या आगमनासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. गेल्या दोन आठवड्यांत अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरातील प्रतिकूल हवामान प्रणाली, तसेच केरळ, कर्नाटक आणि लक्षद्वीप बेटांवर सलग पाऊस न झाल्यामुळे मान्सूनची प्रगती काहीशी रखडली होती. ● पान २ वर

### मुंबई, ठाणे आणि पालघरमध्ये पावसाची शक्यता

दरम्यान, मुंबई, ठाणे आणि पालघर परिसरात ७ जूनपर्यंत ढगाळ वातावरण राहण्याचा अंदाज आहे. काही ठिकाणी मेघगर्जनेसह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडू शकतो. तसेच वाऱ्याचा वेगही वाढण्याची शक्यता आहे.

# दिव्यांग संस्थांना मोठा दिलासा; ५८ संस्थांना त्रुटी पूर्ततेची संधी

### ७४ उपक्रमांना १०० टक्के वेतन अनुदानासाठी अंतिम मुदत

● मुंबई, विशाल कारंडे :

राज्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कार्यरत विशेष शाळा आणि पुनर्वसन संस्थांना शासनाने मोठा दिलासा दिला असून विविध अनुदान योजनांअंतर्गत अपात्र ठरलेल्या संस्थांना त्रुटी पूर्ततेची अंतिम संधी देण्यात आली आहे. दिव्यांग सक्षमीकरण विभागाने यासंदर्भात स्वतंत्र आदेश जारी करून संबंधित संस्थांकडून आवश्यक कागदपत्रे निश्चित मुदतीत सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

शासन निर्णय १६ जुलै २०२४ अन्वये अनुदान तत्त्वावर मान्यता मिळविण्यासाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची राज्यस्तरीय तपासणी समितीने छाननी केली होती. त्यामध्ये निर्धारित मुदतीत प्राप्त ५२ प्रस्ताव आणि मुदतीनंतर प्राप्त ६ प्रस्ताव अशा एकूण ५८ उपक्रमांचे प्रस्ताव अपात्र ठरविण्यात आले होते. मात्र, दिव्यांग सक्षमीकरण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत संबंधित संस्थांना त्रुटी दूर करण्याची संधी देण्याचा निर्णय घेण्यात आला. ● पान २ वर



## ( ) थोडक्यात ( )

### एअर इंडियाची इमारत १५ ऑगस्टपासून सेवेत रुजू होणार

मुंबई : एअर इंडियाच्या इमारतीत शासकीय कार्यालयांचे स्थलांतर करण्यापूर्वी इमारतीची सखोल संरचनात्मक तपासणी करण्यात यावी. तसेच आवश्यक दुरुस्तीची कामे पूर्ण झाल्यानंतरच अंतर्गत सजावट आणि इतर विकासकामे हाती घेण्यात यावीत, असे निर्देश सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी बुधवारी दिले. एअर इंडिया इमारतीची दुरुस्ती तसेच रंगरंगोटी करून इमारत येत्या १५ ऑगस्टपासून वापरत आणण्याचे बांधकाम विभागाचे नियोजन आहे .नरिमन पॉईंट येथील ऐतिहासिक 'एअर इंडिया' इमारतीचे महाराष्ट्र सरकारकडे हस्तांतरण झाल्यानंतर शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी बुधवारी इमारतीची प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

### अल्पसंख्याक विभागातील रिक्त पदे तातडीने भरा – उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

मुंबई : शिक्षण, कौशल्य विकास, रोजगारनिर्मिती आणि सामाजिक सक्षमीकरणाच्या माध्यमातून अल्पसंख्याक समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असून, अल्पसंख्याक विभागातील रिक्त पदे कालमर्यादेत तातडीने भरण्याची प्रक्रिया गतीमान करावी. तसेच विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभाच्या योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा अल्पसंख्याक विकास मंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले. यावेळी आमदार अबू आझमी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले, तर आमदार सना मलिक-शेख, आमदार रईस शेख उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख आदि उपस्थित होते.

# संत तुकाराम महाराजांची पालखी २४ जुलैला पंढरपुरात

### आषाढी वारीसाठी ७ जुलैला देहूतून प्रस्थान

● पुणे, शकील शेख :

आषाढी पायी वारीसाठी संत तुकाराम महाराज यांची पालखी ७ जुलै रोजी देहू येथून पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. १८ दिवसांचा प्रवास पूर्ण करून पालखी सोहळा २४ जुलै रोजी पंढरपूर येथे दाखल होणार असून यंदा या पालखी सोहळ्याचे ३४१ वे वर्ष आहे. याबाबतची माहिती श्री संत तुकाराम महाराज संस्थान यांनी दिली.







पालखीचे प्रस्थान ७ जुलै रोजी होणार असून पहिला मुक्काम देहू येथील इनामदार वाड्यात असेल. ८ जुलै रोजी पालखी इनामदार वाड्यातून प्रस्थान केल्यानंतर पहिल्या अभंग आरतीसाठी अनगडशहा बाबा दर्गा परिसरात, तर दुसऱ्या अभंग आरतीसाठी चिंचोली येथील पादुका मंदिरात थांबेल. त्यानंतर संध्याकाळी आकुर्डी येथील श्री विठ्ठल मंदिरात पालखीचा मुक्काम असेल. ● पान २ वर

# वाढवण बंदरात लघु उद्योगात स्थानिकांना प्राधान्य द्या – आमदार विलास तरे

● नवी मुंबई, भावना जैन :

प्रस्तावित वाढवण बंदर प्रकल्पातील लघु व सहाय्यक कामांमध्ये स्थानिक भूमिपुत्र, आदिवासी व प्रकल्पग्रस्त नागरिकांना प्राधान्य द्या अशी मागणी बोईसर विधानसभा आमदार विलास तरे यांनी जे.एन.पी.ए. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक भा.प्र. से. गौरव दयाल (वाढवण बंदर अधिकारी) यांची प्रत्यक्ष भेट भेट घेऊन मागणी करत लेखी निवेदन दिले आहे.यावेळी आमदार तरे म्हणाले की, पालघर जिल्ह्यातील प्रस्तावित वाढवण बंदर हा देशाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाकांक्षी व विकासात्मक प्रकल्प असून या प्रकल्पाचा मोठा भाग माझ्या बोईसर



विधानसभा मतदारसंघाच्या कार्यक्षेत्राशी निगडित आहे. या प्रकल्पामुळे परिसरातील अनेक गावांतील स्थानिक नागरिक, आदिवासी बांधव, मच्छीमार समाज तसेच इतर प्रकल्पग्रस्त कुटुंबांवर थेट व अप्रत्यक्ष परिणाम होणार आहे. वाढवण बंदर प्रकल्पाच्या उभारणीदरम्यान तसेच भविष्यात प्रकल्पाशी संबंधित विविध लघु, सहाय्यक व पूरक कामे मोठ्या प्रमाणावर निर्माण होणार आहेत. यामध्ये वाहतूक, सुरक्षा, स्वच्छता, देखभाल, कार्यालयीन सहाय्य, बांधकामाशी संबंधित लघु कंत्राटी कामे, साहित्य पुरवठा, यंत्रसामग्री सहाय्य, भोजन व्यवस्था, लॉजिस्टिक सेवा तसेच इतर विविध सेवा क्षेत्रातील संधी उपलब्ध होणार आहेत. ● पान २ वर

### जे.एन.पी.ए. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक भा.प्र.से. गौरव दयाल यांची घेतली प्रत्यक्ष भेट

# विद्यार्थ्यांसाठी मोफत बस पास, खासगी रोजगार विनिमय व्यवस्था आणि बरेच काही

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

डी. के. शिवकुमार यांनी बुधवारी कर्नाटकचे नवीन मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. प्राप्त माहितीनुसार, मंत्रिमंडळात प्रामुख्याने ओळखीचेच चेहरे आहेत; सरकारमध्ये केवळ दोन नवीन मंत्र्यांचा समावेश करण्यात आला आहे. पदभार स्वीकारल्यानंतर काही वेळातच मुख्यमंत्री शिवकुमार यांनी मंत्रिमंडळाची पहिली बैठक घेतली, ज्यामध्ये सहा महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. हे निर्णय विद्यार्थी, तरुण, मालमत्ता मालक, बेरोजगार आणि स्थानिक रहिवाशांवर केंद्रित होते.

**राज्यात सुशासन आणि विकासाचे नवे पर्व सुरू :** मंत्रिमंडळ बैठकीनंतर विधानसौध येथे आपल्या मंत्र्यांसह आयोजित पत्रकार परिषदेला संबोधित करताना शिवकुमार यांनी सांगितले की, राज्यात सुशासन आणि विकासाचे नवे पर्व सुरू करण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे. आपल्या राजकीय प्रवासावर प्रकाश टाकताना मुख्यमंत्र्यांनी नमूद केले की, सार्वजनिक जीवनात त्यांना कठीण प्रसंग आणि यश या दोन्हींचा सामना करावा लागला आहे; अगदी तिहार तुरुंगातील कारावासासह कठीण काळातही ते ठामपणे उभे राहिले. त्यांनी यावर भर दिला की, मुख्यमंत्र्यांची खुर्ची ही कर्नाटकच्या जनतेची आहे, ती कोणत्याही एका व्यक्तीची नाही.



**आमदारांकडून एकमताने त्यांच्यावर राज्याचे नेतृत्व सोपवण्याची जबाबदारी :** कर्नाटकच्या नवीन मुख्यमंत्र्यांनी आठवण करून दिली की, माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी आपले वचन पूर्ण केले आणि आपल्या पदाचा त्याग केला; त्यानंतर आमदारांनी एकमताने त्यांच्यावर राज्याचे नेतृत्व करण्याची जबाबदारी सोपवली. त्यांनी जनतेला आश्वासन दिले की, सरकार वैयक्तिक आणि राजकीय हितसंबंधांच्या पलीकडे जाऊन कार्य करेल. मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही भागांतील लोकांना भेडसावणाऱ्या आव्हानांची त्यांना पूर्ण जाणीव आहे; तसेच गावांमध्येच रोजगाराच्या संधी निर्माण करून ग्रामीण भागातून शहरांकडे होणारे स्थलांतर रोखणे किती गरजेचे आहे. ● पान २ वर

### 'डीकें'नी राजकोष केला खुला

# तुकाराम मुंढेंची धडक कारवाई सुरुच

### सात दिवसात १०२ व्यक्तींना अटक अन् १ कोटींचा साठा जप्त

● नागपूर, नितीन देवळेकर :

राज्यातील प्रतिबंधित पान मसाला, गुटखा, भेसळ अन्नपदार्थाविरोधात अन्न व औषध प्रशासनाने राज्यभर सात दिवस धडक मोहीम राबवत २५ मे ते ३१ मे २०२६ या कालावधीत एकूण १ कोटी ५८ लाख २८ हजार ६७७ रुपयांचा साठा जप्त केला असून १०२ व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. एकूण २०३ आस्थापनांवर कारवाई केली. तसेच ८६ आस्थापना सील करण्यात आल्या आहेत.

आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार राज्यभर प्रतिबंधित गुटखा, पानमसाला आणि तत्सम पदार्थांच्या उत्पादन, साठवणूक व विक्रीविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली. या कारवाईत अधिक संशयास्पद अन्न व औषध उत्पादक आणि विक्रेत्यांच्या ठिकाणांवर थेट छापे टाकण्यात आले. यात कोकण विभाग (४७ कारवाया आणि ४६ व्यक्तींना अटक) , बृहन्मुंबई (२२ कारवाया आणि २३ व्यक्तींना अटक), पुणे विभाग (१४ कारवाया



आणि १३ व्यक्तींना अटक), नाशिक विभाग (५ कारवाया आणि ५ व्यक्तींना अटक), छत्रपती संभाजीनगर विभाग (८ कारवाया आणि ८ व्यक्तींना अटक), अमरावती विभाग (५ कारवाया आणि ५ व्यक्तींना अटक) आणि नागपूर विभाग (२ कारवाया आणि २ व्यक्तींना अटक) अशा सात आस्थापनांवर कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये भारतीय न्याय संहितेच्या कलम १२३, २२३, २७४, २७५ तसेच अन्न सुरक्षा व मानके कायद्याच्या कलम २६, २७, ३०(२)(अ) आणि ५९ अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ● पान २ वर

# पालकांची चिंता वाढणार

### स्कूलबसची १५ टक्के भाडेवाढ

● मुंबई, दिगंबर जाधव :

विद्यार्थ्यांना स्कूलबसने शाळेत पाठविणाऱ्या पालकांची चिंता वाढण्याची शक्यता आहे. कारण, शहरातील विविध शाळांच्या बस सेवांच्या शुल्कात येत्या शैक्षणिक वर्षापासून वाढ होणार आहे. इंधन दरवाढ, वाहनांच्या देखभालीचा वाढता खर्च, चालक आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांचे वेतन तसेच विमा खर्च यामुळे बस सेवा





चालविणाऱ्या संस्थांवर आर्थिक ताण वाढला असल्यामुळे अनेक शाळांनी बस शुल्क वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. स्कूल बस ओनर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्रने (SBOA) याबाबत घोषणा केली आहे.संघटनेने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले की, ● पान २ वर

# संपन्न महाराष्ट्रासाठी पायाभूत सुविधांचे निर्मिती प्रकल्प गतीने पूर्ण करावेत – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

● मुंबई, विशाल पाटील :

महाराष्ट्राच्या संपन्नतेसाठी पायाभूत सुविधांच्या निर्मिती प्रकल्पांची कामे गतीने पूर्ण होणे गरजेचे आहे. संबंधित यंत्रणांनी प्रकल्प पूर्णत्वातील अडचणी दूर कराव्यात. कंत्राटदाराला देण्यात आलेल्या कालावधीत प्रकल्प पूर्ण झाला पाहिजे याकडे संबंधित यंत्रणांनी लक्ष द्यावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. विलंबाने काम पूर्ण करणाऱ्या कंत्राटदारांना पुढील कुठलेही नवीन काम संबंधित यंत्रणेने देऊ नये, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.



सह्याद्री अतिथिगृह येथे आयोजित पायाभूत सुविधा मुख्यमंत्री वॉर रूम बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस प्रकल्पांचा आढावा घेताना बोलत होते. कुठल्याही परिस्थितीत पायाभूत सुविधांचे प्रकल्प तीन ते साडेतीन वर्षांमध्ये पूर्ण झाले पाहिजे, असे निर्देश देऊन मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, निविदा प्रक्रिया राबवताना त्यामध्ये कंत्राटदाराने मागील प्रकल्प पूर्ण करण्यासाठी लावलेल्या कालावधीच्या निकषाचाही समावेश असावा. कंत्राटदारांनी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी विलंब केल्यास देशाचे व पर्यायाने राज्याचे नुकसान होते. त्यामुळे कुठल्याही परिस्थितीत प्रकल्पाच्या पूर्णत्वामध्ये होणारा विलंब खपवून घेतला जाणार नाही. प्रकल्पाच्या पूर्णत्वामध्ये अनेक अडचणी असतात. मात्र यंत्रणांनी अडचणींवर मात करीत पुढे वाटचाल केली पाहिजे. ● पान २ वर

### वॉर रूम बैठकीत विविध प्रकल्पांचा आढावा

# भारतासाठी सुवर्णसंधी

भारत-अमेरिका संबंधांमध्ये निर्माण झालेला तणाव काही प्रमाणात ओसरत असल्याची चिन्हे दिसू लागली आहेत. आर्थिक वर्ष 2026 साठी भारतीय अर्जदारांसाठीचा 'ईबी-2' व्हिसा कोटा संपल्याची घोषणा अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाने केली असली, तरी ग्रीन कार्डसंदर्भातील वादग्रस्त नियमांबाबत अमेरिकेच्या गृहमंत्रालयाने दिलेल्या स्पष्टीकरणामुळे भारतीय व्यावसायिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. यानुसार, ग्रीन कार्ड प्रक्रियेदरम्यान त्यांना अमेरिकेतून बाहेर पडून भारतात परतण्याची सक्ती राहणार नाही.

ग्रीन कार्ड मिळवण्यासाठी अमेरिकेतच राहून केली जाणारी 'ॲडजस्टमेंट ऑफ स्टेटस' प्रक्रिया अधिक कठोर करण्यात आल्याने एच-1बी व्हिसावर कार्यरत असलेल्या भारतीय आयटी व्यावसायिकांमध्ये चिंता वाढली होती. नव्या नियमांमुळे सर्व अर्जदारांना अमेरिका सोडून भारतात परत जाऊनच पुढील प्रक्रिया करावी लागेल, अशी भीती व्यक्त केली जात होती. आधीच ग्रीन कार्डसाठी दीर्घ प्रतीक्षा आणि त्यात देश सोडण्याची शक्यता यामुळे भारतीय समुदाय अस्वस्थ झाला होता. मात्र, वाढत्या विरोधानंतर अमेरिकन प्रशासनाने भूमिका मवाळ केली. आता प्रत्येक प्रकरणाची स्वतंत्रपणे छाननी केली जाणार असल्याने कायदेशीररित्या वास्तव्यास असलेल्या अर्जदारांना घाबरण्याचे कारण उरलेले नाही.

या संपूर्ण घडामोडीत अमेरिकेची विसंगत भूमिका पुन्हा एकदा अधोरेखित झाली. 'इंडियास्पोरा' या संस्थेने सादर केलेली आकडेवारी याबाबत महत्त्वाची आहे. अमेरिकेच्या लोकसंख्येत भारतीयांचे प्रमाण केवळ दीड टक्का असले, तरी फेडरल कर महसुलात त्यांचे योगदान सुमारे सहा टक्के आहे. अमेरिकेतील जवळपास 60 टक्के हॉटेल्स भारतीयांच्या मालकीची असून त्यातून सुमारे 40 लाख रोजगार निर्माण होतात. सिलिकॉन व्हॅलीतील तंत्रज्ञान क्षेत्रातही भारतीयांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. असे असूनही भारतीयांबाबत वेळोवेळी कठोर आणि जाचक धोरणे अवलंबली जात असल्याची भावना व्यक्त केली जाते. विशेषत: ट्रम्प प्रशासनाच्या काळात स्थलांतरितांविषयीची कठोर भूमिका अधिक स्पष्टपणे दिसून आली.

दीर्घकाळापासून अमेरिकेत जाऊन स्थायिक होणे हे भारतीय तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यावसायिकांचे मोठे स्वप्न राहिले आहे. आकर्षक वेतन, जागतिक दर्जाच्या संशोधनाची संधी आणि कायमस्वरूपी नागरिकत्वाची शक्यता यामुळे अनेक पिढ्या अमेरिकेकडे वळल्या. मात्र, ग्रीन कार्डसाठी वाढता प्रतीक्षा कालावधी, व्हिसासंबंधीची अनिश्चितता आणि मोठ्या प्रमाणातील कर्मचारी कपात यांमुळे हे स्वप्न आता धूसर होताना दिसत आहे. परंतु, भारतासाठी हीच परिस्थिती मोठी संधी ठरू शकते.

गेल्या दशकात भारताचे तंत्रज्ञान क्षेत्र केवळ कमी खर्चातील सेवा केंद्र म्हणून न राहता उच्च कौशल्याधारित नवसंशोधनाचे केंद्र म्हणून विकसित झाले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, प्रॉडक्ट इंजिनिअरिंग, ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्स आणि डीप-टेक संशोधन या क्षेत्रांत भारताने लक्षणीय प्रगती साधली आहे. अमेरिकेतील अनिश्चिततेमुळे अधिकाधिक भारतीय व्यावसायिक मायदेशी परतण्याचा विचार करत असतील, तर त्यांच्यासाठी आवश्यक रोजगार, गुंतवणूक आणि सक्षम परिसंस्था उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न केंद्र सरकारकडून सुरू आहेत.

अमेरिका ही आजही जगातील सर्वात मोठी तंत्रज्ञान बाजारपेठ असून तेथील वेतनमान इतर देशांच्या तुलनेत अधिक आहे. तरीसुद्धा भारतीयांना तेथे भेडसावणाऱ्या अडचणींकडे दुर्लक्ष करणे आता शक्य राहिलेले नाही. एच-1बी व्हिसाधारक आणि ग्रीन कार्डच्या प्रतीक्षेत असलेल्या व्यक्तींमध्ये भारतीयांचे प्रमाण सर्वाधिक आहे. विविध अहवालांनुसार, दहा लाखांहून अधिक भारतीय नागरिक अद्याप ग्रीन कार्डच्या प्रतीक्षेत आहेत. काही श्रेणींमध्ये ही प्रतीक्षा अनेक दशकांपर्यंत पोहोचली आहे. परिणामी, अनेकांसाठी प्रश्न केवळ उत्पन्नाचा राहिलेला नसून भविष्यातील सुरक्षिततेचा बनला आहे. विशीत अमेरिकेत गेलेले अनेक व्यावसायिक चाळिशीत पोहोचल्यानंतरही कायमस्वरूपी नागरिकत्वाची वाट पाहत आहेत. त्यामुळे करिअरमधील पुढील वाटचाल, उद्योजकतेची स्वप्ने आणि कुटुंबाचे दीर्घकालीन नियोजन यांवर परिणाम होत आहे. त्यातच वेळोवेळी होणाऱ्या नोकरकपाती आणि स्थलांतर धोरणांतील बदलांमुळे परिस्थिती अधिक गुंतागुंतीची बनली आहे. वाढता राहणीमान खर्च आणि आर्थिक अनिश्चितता यांमुळे पाश्चात्य देशांचे आकर्षणही काहीसे कमी झाले आहे.

या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने दूरदृष्टीने पावले उचलण्याची आवश्यकता आहे. भारताच्या तंत्रज्ञान क्षेत्रात गेल्या काही वर्षांत मोठे संरचनात्मक बदल झाले असून विशेष कौशल्यांची मागणी सातत्याने वाढत आहे. जागतिक स्तरावरील अनेक कंपन्यांनी भारतात क्लाऊड, कृत्रिम बुद्धिमत्ता, संशोधन आणि विकास केंद्रे उभारली आहेत. ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्समध्ये मध्यम आणि वरिष्ठ स्तरावरील तज्ज्ञांची मागणी झपाट्याने वाढत आहे. विशेषत: उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रांमध्ये ही गरज अधिक जाणवते. कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा इंजिनिअरिंग आणि सायबर सुरक्षा या क्षेत्रांत सध्या 40 ते 55 टक्क्यांपर्यंत कौशल्यवान मनुष्यबळाची कमतरता आहे.परदेशातून परतणाऱ्या अनुभवी व्यावसायिकांना कंपन्यांमध्ये धोरणात्मक नेतृत्व आणि नव्या क्षमता विकसित करण्यासाठी महत्त्वाच्या जबाबदाऱ्या दिल्या जात आहेत. मुंबई, बंगळूर, पुणे, हैदराबाद आणि दिल्ली यांसारख्या महानगरांमध्ये आज जागतिक दर्जाच्या सुविधा, आधुनिक पायाभूत व्यवस्था आणि बहुसांस्कृतिक जीवनशैली उपलब्ध आहे. 'ऑब्झर्व्हर रिसर्च फाऊंडेशन'च्या अभ्यासानुसार, 2016 ते 2023 या कालावधीत भारतात सुरू झालेल्या सुमारे 600 उच्च-तंत्रज्ञान स्टार्टअप्सपैकी जवळपास एक-तृतीयांश उद्योग परदेशातून परतलेल्या उद्योजकांनी उभारले आहेत.भारतीय प्रतिभा, अनुभव आणि भांडवलाचा देशाच्या विकासासाठी अधिक प्रभावीपणे वापर करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांनी समन्वित व ठोस धोरणे आखण्याची गरज आहे. चीन आणि तैवान यांनी आपल्या प्रतिभावंतांना मायदेशी परत आणण्यासाठी विशेष उपक्रम राबवले होते. त्याच धर्तीवर भारतानेही प्रभावी उपाययोजना केल्यास परदेशात जाणाऱ्या बुद्धिमत्तेचा प्रवाह भविष्यात देशाच्या प्रगतीसाठी मोठी ताकद ठरू शकतो. योग्य नियोजन आणि धोरणात्मक प्रयत्नांमुळे 'ब्रेन ड्रेन'चे रूपांतर 'ब्रेन गेन'मध्ये होणे अशक्य नाही.

– अनिकेत घनश्याम भंकाळ

संपादकीय

## पान १ वरुन

### केरळमध्ये मान्सून दाखल

**महाराष्ट्रात पुढील २ दिवसांत मान्सूनचे आगमन?**

केरळमध्ये आगमन झाल्यानंतर आता ६ ते ७ तारखेला मान्सून तळकोकणात दाखल होण्याची शक्यताही काही रिपोर्ट्समध्ये वर्तवण्यात आली असून त्यानंतर मुंबई, कोकण, पश्चिम महाराष्ट्रासह इतर भागात पावसाला सुरुवात होऊ शकते. पुढील दोन ते तीन दिवसांत मोसमी पाऊस गोव्याच्या संपूर्ण भागात, महाराष्ट्राच्या काही भागांत तसेच आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि ईशान्य भारतातील काही राज्यांमध्ये पुढे सरकण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तविली आहे.

**केरळमध्ये मुसळधार पावसाचा इशारा**

मान्सून दाखल झाल्यानंतर केरळमध्ये पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. अलप्पुझा, कोट्टायम आणि एर्नाकुलम जिल्ह्यांसाठी हवामान विभागाने ऑरेंज अलर्ट जारी केला असून काही भागांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

### दिव्यांग संस्थांना मोठा दिलासा...

संबंधित संस्थांना पत्र प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आवश्यक कागदपत्रे आणि माहिती ई-मेलद्वारे शासनाकडे सादर करावी लागणार आहे. या यादीमध्ये मतिमंद, मूकबधिर, अंध, बहुविकलांग विद्यार्थ्यांसाठी कार्यरत निवासी व विशेष शाळांचा समावेश असून काही अनुदानित संस्थांमधील वाढीव विद्यार्थी संख्येला मान्यता देण्यासंबंधीचे प्रस्तावही आहेत.

राज्यातील १२१ विशेष उपक्रमांना ५० टक्क्यांवरून १०० टक्के वेतन अनुदान देण्याच्या प्रक्रियेलाही वेग देण्यात आला आहे. ६ नोव्हेंबर २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार ५० टक्के वेतन अनुदानावर मान्यता प्राप्त झालेल्या १२१ विशेष उपक्रमांपैकी अनेक संस्थांनी १०० टक्के वेतन अनुदानासाठी प्रस्ताव सादर केले आहेत. आतापर्यंत ७४ उपक्रमांचे प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाले असून त्यामधील त्रुटी दूर करण्यासाठी संबंधित संस्थांना अंतिम संधी देण्यात आली आहे.

विभागाने स्पष्ट केले आहे की, राज्यस्तरीय छाननी समितीने अपात्र ठरविलेल्या ६८ उपक्रमांसह मुदतीनंतर प्रस्ताव सादर केलेल्या ६ उपक्रमांचा समावेश असलेल्या एकूण ७४ संस्थांनी आवश्यक पूर्तता करावी. या संस्थांना १५ दिवसांच्या आत आवश्यक माहिती आणि कागदपत्रे शासनाकडे सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

याशिवाय, अद्याप प्रस्ताव सादर न केलेल्या उर्वरित ४७ उपक्रमांना १० दिवसांच्या आत प्रस्ताव सादर करण्याची मुदत देण्यात आली आहे. निर्धारित मुदतीत प्रस्ताव प्राप्त न झाल्यास संबंधित संस्था बंद असल्याचे किंवा अनुदान धोरणातील निकषांची पूर्तता करण्यात अपयशी ठरल्याचे गृहीत धरून त्यांना १०० टक्के वेतन अनुदानासाठी अपात्र ठरविण्यात येणार असल्याचे विभागाने स्पष्ट केले आहे.

त्रुटी पूर्ततेसाठी संस्थांना वैध नोंदणी प्रमाणपत्र, जिल्हा मूल्यांकन समिती व छाननी समिती अहवाल, विद्यार्थी व कर्मचारी उपस्थितीचे बायोमेट्रिक अहवाल, यूडीआयडी व आधार नोंदणीची माहिती, मागील तीन वर्षांचे लेखापरीक्षण अहवाल, संस्थेची घटना, विश्वस्तांची यादी तसेच आरक्षण धोरणाचे पालन केल्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागणार आहे.

दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे, पात्र संस्थांना शासनाच्या अनुदानाचा लाभ मिळवून देणे आणि विशेष शाळांच्या कामकाजाला आर्थिक स्थैर्य प्रदान करणे हा या संपूर्ण प्रक्रियेमागील उद्देश असल्याचे दिव्यांग सक्षमीकरण विभागाने स्पष्ट केले आहे. सर्व प्रस्तावांची छाननी पूर्ण झाल्यानंतर पात्र प्रकरणे वित्त विभागाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात येणार आहेत.

### संत तुकाराम महाराजांची पालखी...

यानंतर ९ व १० जुलै रोजी पुण्यातील नाना पेठ येथे मुक्काम होणार आहे. ११ जुलै रोजी लोणी काळभोर, १२ जुलै रोजी यवत, १३ जुलै रोजी वरवंड, १४ जुलै रोजी उंडवडी गवळ्याची आणि १५ जुलै रोजी बारामती येथील शारदा प्रांगणात पालखी मुक्कामी असेल.

१६ जुलै रोजी काटेवाडी येथे मेंढ्याचे रिंगण पार पडून सणसर पालखी तळावर मुक्काम होईल. १७ जुलै रोजी बेलवाडी येथे पहिले गोल रिंगण झाल्यानंतर पालखी निमगाव केतकी येथे मुक्कामी असेल. १८ जुलै रोजी इंदापूर येथे दुसरे गोल रिंगण होऊन पालखी तळावर मुक्काम होईल. १९ जुलै रोजी सराटी, २० जुलै रोजी निरा स्नानानंतर अकलूज माने येथे तिसरे गोल रिंगण पार पडेल आणि पालखी तळावर मुक्काम असेल.

२१ जुलै रोजी माळीनगर येथे पहिले उभे रिंगण झाल्यानंतर बोरगाव येथे मुक्काम होईल. २२ जुलै रोजी पिराची कुरोली, तर २३ जुलै रोजी बाजीराव विहीर येथे दुसरे उभे रिंगण पार पडून वाखरी पालखी तळावर मुक्काम असेल. २४ जुलै रोजी पादुकांजवळ आरती आणि तिसरे उभे रिंगण झाल्यानंतर पालखीचे पंढरपूर येथे आगमन होईल. २५ जुलै रोजी आषाढी एकादशीचा मुख्य सोहळा साजरा करण्यात येणार आहे.यंदाच्या आषाढी वारीसाठी राज्यभरातील लाखो वारकरी सहभागी होणार असून पालखी मार्गावरील सर्व तयारीला वेग आला आहे.

**पालखीचा परतीचा प्रवास**

आषाढी एकादशीनंतर पालखी २८ जुलैपर्यंत पंढरपुरात विसावेल. त्यानंतर २९ जुलै रोजी वाखरी, ३० जुलै रोजी म्हाळुंगे माकडाचे येथील श्री विठ्ठल मंदिर, ३१ जुलै रोजी वडापुरी, १ ऑगस्ट रोजी लासुर्णे, २ ऑगस्ट रोजी बऱ्हाणपूर, ३ ऑगस्ट रोजी हिंगणीगाडा, ४ ऑगस्ट रोजी वरवंड, ५ ऑगस्ट रोजी कुंजीरवाडी फाटा, ६ व ७ ऑगस्ट रोजी पुण्यातील नवी पेठ, ८ ऑगस्ट रोजी पिंपरीगाव येथे मुक्काम करीत ९ ऑगस्ट रोजी पालखी सोहळा पुन्हा देहूत दाखल होणार आहे.

### वाढवण बंदरात लघु उद्योगात...

या सर्व कामांमध्ये स्थानिक भूमिपुत्र, आदिवासी युवक-युवती, बेरोजगार तरुण तसेच प्रकल्पग्रस्त कुटुंबांना प्राधान्य देणे अत्यंत आवश्यक आहे.

विकासाचा दृष्टिकोन ठेवणाऱ्या स्थानिक नागरिकांनी या प्रकल्पासाठी विकासाच्या दृष्टीने सकारात्मक भूमिका घेतली असून, त्यांच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या रोजगार व व्यवसाय संधींचा लाभ त्यांना प्रथम मिळणे अपेक्षित आहे. त्यामुळे वाढवण बंदराशी संबंधित सर्व विभाग, कंत्राटदार संस्था व एजन्सींना आवश्यक निर्देश देऊन लघु व सहाय्यक कामांमध्ये स्थानिकांना प्राधान्य देण्याबाबत स्पष्ट धोरण अवलंबण्यात यावे, अशी मागणी आमदार विलास तरे यांनी जे.एन.पी.ए. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक भा.प्र.से. गौरव दयाल यांची प्रत्यक्ष भेट घेऊन लेखी निवेदन देऊन केली आहे.

दरम्यान जे.एन.पी.ए. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक भा.प्र.से. गौरव दयाल म्हणाले की, स्थानिकांना प्राधान्याच्या अनुषंगाने आवश्यक ते सर्व उपाययोजना करण्यात येतील. तसेच, स्थानिक युवकांना कौशल्य विकास, प्रशिक्षण व रोजगारक्षम बनविण्यासाठी विशेष उपक्रम राबविण्यात येत असून यामुळे प्रकल्पाविषयी स्थानिकांमध्ये विश्वास निर्माण होण्यास मदत होईल तसेच प्रकल्प आणि स्थानिक समाज यांच्यात समन्वय व सहकार्याची भावना अधिक दृढ करण्याचा आमचा मानस आहे, असे दयाल म्हणाले.

### विद्यार्थ्यांसाठी मोफत बस पास...

यावर त्यांनी भर दिला. समाजातील सर्व घटकांची सेवा करण्यासाठी मंत्रिमंडळ एकसंध संघ म्हणून काम करेल, असा त्यांनी ठाम विश्वास व्यक्त केला.

**सर्व विद्यार्थ्यांसाठी मोफत बस पास :** शिवकुमार यांच्या मंत्रिमंडळाने कर्नाटकातील सर्व विद्यार्थ्यांसाठी यात सरकारी आणि खासगी अशा दोन्ही शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांचा समावेश आहे. मोफत बस पास मंजूर केले आहेत. या योजनेचा लाभ SSLC, PUC, पदवी आणि पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांना मिळेल. शिवकुमार यांनी नमूद केले की, सध्या केवळ महिला प्रवाशांना उपलब्ध असलेला मोफत प्रवासाचा लाभ, समाजातील इतर घटकांनाही मिळावा, अशी मागणी विद्यार्थ्यांनी वारंवार केली होती. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी, विद्यार्थ्यांना बस पाससाठी अर्ज करणे आवश्यक असेल. या योजनेमुळे सरकारवर दरवर्षी २५० कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक बोजा पडेल, असा सरकारचा अंदाज आहे.

**खासगी रोजगार विनिमय केंद्रांची स्थापना :** युवकांसाठी रोजगाराच्या संधी वाढवण्याच्या उद्देशाने सरकारने पूर्वीच्या सरकारी रोजगार विनिमय प्रणालीच्या धर्तीवर आधारित खासगी रोजगार विनिमय प्रणाली स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रस्तावित प्रणालीअंतर्गत खासगी कंपन्यांना त्यांच्याकडील रिक्त पदे आणि मनुष्यबळाची आवश्यकता यांची नोंदणी करणे अनिवार्य असेल. सरकार नोकरी शोधणाऱ्यांना उद्योगांच्या गरजांनुसार तयार केलेले कौशल्य आधारित प्रशिक्षण देईल आणि त्यांना खासगी संस्थांमध्ये नोकरी मिळवून देण्यास मदत करेल. मुख्यमंत्री यांनी स्पष्ट केले की, विशेषत: कन्नड भाषिक जनतेसाठी रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जातील. तीन मंत्र्यांचा समावेश असलेली एक समिती या प्रस्तावाची छाननी करेल, उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधींशी सल्लामसलत करेल आणि एका महिन्याच्या आत आपला अहवाल सादर करेल. नोंदणी आणि इतर संबंधित सेवा ऑनलाइन उपलब्ध करून दिल्या जातील.

**१० हजार 'भारत जोडो युवा संघांची' स्थापना :** काँग्रेसच्या नेतृत्वाखालील शिवकुमार मंत्रिमंडळाने संपूर्ण राज्यात १० हजार 'भारत जोडो युवा संघांची' (युवक संघटनांची) स्थापना करण्यास मंजुरी दिली आहे. सरकारने प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये युवक गट स्थापन करण्याची योजना आखली असून, प्रत्येक संघटनेमध्ये अंदाजे १५० सदस्यांचा समावेश असेल. प्रत्येक संघटनेला 10 लाख रुपयांचे आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे. शिवकुमार यांच्या मते, या उपक्रमाचा उद्देश युवकांमध्ये क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम, सामाजिक संवाद, नेतृत्व विकास आणि सुप्त गुणांचा शोध या गोष्टींना चालना देणे हा आहे.

**मालमत्ता मालकांसाठी 'ऑक्युपन्सी सर्टिफिकेट' (OC) नियमांमध्ये शिथिलता :** आणखी एका महत्त्वपूर्ण निर्णयात सरकारने 'ऑक्युपन्सी सर्टिफिकेट' (OC) आणि 'कम्प्लिशन सर्टिफिकेट' (CC) शी संबंधित सवलतींची व्याप्ती वाढवलीय. सध्या बंगळुरूच्या हद्दीत १२०० चौरस फुटांपर्यंतच्या भूखंडांवर बांधलेल्या इमारतींसाठी काही विशिष्ट सवलती उपलब्ध आहेत. मंत्रिमंडळाने हा लाभ २५०० चौरस फुटांपर्यंतच्या मालमत्तांनाही लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. ही सवलत अशा इमारतींना एकदाच (one-time basis) लागू होईल, ज्यांचे बांधकाम मंजूर इमारत नियमांपेक्षा २० टक्क्यांपर्यंत विचलित (deviate) झालेले आहे.

**'B-खाता'चे 'A-खात्या'मध्ये रूपांतर करण्याच्या उपक्रमाचा राज्यव्यापी विस्तार :** सरकारने 'B-खाता' असलेल्या मालमत्तांचे 'A-खात्या'मध्ये रूपांतर करण्याच्या उपक्रमाचा संपूर्ण कर्नाटक राज्यात विस्तार करण्याचाही निर्णय घेतला आहे. यापूर्वी मर्यादित व्याप्ती असलेली ही योजना आता शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही भागांतील मालमत्तांना लागू होईल; ज्यामुळे मोठ्या संख्येने मालमत्ता मालकांना त्यांच्या नोंदी नियमित करून 'A-खाता' दर्जा प्राप्त करणे शक्य होईल.

**बंगळुरूच्या रस्ते विकासासाठी २ हजार कोटी :** आपला सहावा प्रमुख निर्णय म्हणून मंत्रिमंडळाने बंगळुरू शहरातील रस्त्यांची सुधारणा आणि दुरुस्ती करण्यासाठी २ हजार कोटींच्या निधी वाटपास मंजुरी दिली. मुख्यमंत्री यांनी स्पष्ट केले की, रस्त्यांचा दर्जा उंचावणे आणि प्रवाशांना भेडसावणाऱ्या अडचणी दूर करणे या उद्देशाने संपूर्ण शहरातील ज्यामध्ये 'ग्रेटर बंगळुरू ऑथॉरिटी' (GBA) अंतर्गत येणाऱ्या क्षेत्रांचाही समावेश आहे, रस्ते पायाभूत सुविधांशी संबंधित समस्यांचे निराकरण करण्यासाठी या निधीचा वापर केला जाणार आहे. या घोषणा म्हणजे नवीन सरकारच्या धोरणात्मक उपक्रमांची पहिली मालिका असून, याचा लाभ संपूर्ण कर्नाटकातील मोठ्या संख्येने लोकांना होईल, अशी अपेक्षा आहे.

### तुकाराम मुंढेंची धडक कारवाई...

या कारवाईत ३४ लाख ५ हजार ४८ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**भेसळयुक्त व निकृष्ट अन्नपदार्थांवरही कारवाई**

अन्न व औषध प्रशासनाच्या 'सेफ फूड, सेफ ड्रग, सेफ महाराष्ट्र' या संकल्पनेअंतर्गत राज्यभर भेसळ, अस्वच्छ अन्न उत्पादक आणि नियमभंग करणाऱ्या अन्न व्यवसायिकांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली. मुंबई, नवी मुंबई, पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, नाशिक, भंडारा, जालना, बीड, नांदेड, परभणी, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, हिंगोली, वर्धा, यवतमाळ, अमरावती, अकोला, वाशीम, जळगाव, रायगड, धुळे आदी जिल्ह्यांमध्ये अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर तपासण्या केल्या.

या मोहिमेत ७३ आस्थापनांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये आंबे, बुंदी लाडू, खवा, बेकरी पदार्थ, कँडी, दूध व दुग्धजन्य पदार्थ, गूळ, खाद्यतेल, तूप, खजूर, आईस्क्रीम, कुल्फी, फ्रोजन डेझर्ट, मसाले, शेंगदाणा चिक्की तसेच भेसळीसाठी वापरल्या जाणाऱ्या पदार्थांचा समावेश होता. या कारवाईत 1 कोटी 24 लाख २३ हजार 629 रुपये किमतीचा आणि सुमारे 90639 किलो वजनाचा संशयित निकृष्ट व असुरक्षित अन्नसाठा जप्त करण्यात आला. संबंधित अन्न नमुने पुढील विश्लेषणासाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत.

**तक्रारीं देण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाचे आवाहन**

नागरिकांना शुद्ध आणि सुरक्षित अन्न मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे. भेसळ, निकृष्ट दर्जाचे अन्न किंवा प्रतिबंधित पदार्थांचे उत्पादन व विक्री आढळल्यास यापुढे आणखी कठोर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिला आहे. अन्नपदार्थांच्या दर्जाबाबत शंका असल्यास नागरिकांनी अन्न व औषध प्रशासनाशी संपर्क साधावा. यासाठी स्वतंत्र तक्रार नोंदणी ॲप विकसित करण्यात आले आहे. तसेट टोल फ्री क्रमांक १८००२२३६५ आणि ई-मेल : jc-foodhq@gov.in यावर तक्रार करताना नाव, पत्ता, संपर्क क्रमांक, संबंधित आस्थापनेचा अचूक पत्ता आणि कोणत्या अन्नपदार्थात भेसळ होत असल्याची माहिती नमूद करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

### पालकांची चिंता वाढणार

सध्याच्या आर्थिक परिस्थितीत शुल्कवाढीशिवाय दुसरा कोणताही व्यवहार्य पर्याय उपलब्ध नसल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. संघटनेने सांगितले की, ही वाढ फक्त डिझेलच्या वाढलेल्या किमतींमुळे नसून इतर अनेक खर्चांमध्ये झालेल्या वाढीमुळे करावी लागत आहे. यामध्ये इंधन खर्च, चालक आणि कर्मचाऱ्यांचे वेतन, वाहनांची देखभाल, कायदेशीर अनुपालन शुल्क, टोल व परवाना शुल्क, ई-चलन आणि दंडाची वाढती रक्कम तसेच महागाईमुळे वाढलेले परिचालन खर्च यांचा समावेश आहे.

शालेय बस व्यवसायासमोरील अडचणी सोडवण्यासाठी राज्य सरकार, परिवहन विभागांकडे अनेकदा निवेदने देण्यात आली होती. तसेच शुल्कवाढ टाळण्यासाठी विविध पर्यायही सुचविले होते. पण, अद्याप कोणतीही ठोस निर्णय न झाल्याने शुल्कवाढ अपरिहार्य ठरल्याचे संघटनेने स्पष्ट केले. शासनाकडून योग्य मदत न मिळाल्यास शालेय वाहतूक उद्योगाचे अस्तित्व टिकवणे अधिकाधिक कठीण होईल, असे मत संघटनेने व्यक्त केले आहे. तसेच, विद्यार्थ्यांना सुरक्षित, विश्वासार्ह आणि कार्यक्षम वाहतूक सेवा देण्यास शालेय बस चालक-मालक कटिबद्ध आहेत. या कठीण काळात पालक, शाळा आणि सर्व संबंधितांनी सहकार्य व समजूतदारपणा दाखवावा, अशी विनंतीही त्यांनी यावेळी केली आहे.

दरम्यान, दरवाढीमुळे पालकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. आधीच शैक्षणिक शुल्क, पुस्तके, गणवेश आणि इतर खर्च वाढलेले असताना बस दर वाढ झाल्यास आर्थिक भार आणखी वाढेल, अशी प्रतिक्रिया अनेक पालकांनी व्यक्त केली. काही पालक संघटनांनी शुल्कवाढीबाबत पारदर्शकता ठेवण्याची आणि वाढीचे स्पष्ट कारण देण्याची मागणी केली आहे. याबाबत शिक्षण विभागाकडूनही परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत आहे.

### संपन्न महाराष्ट्रासाठी पायाभूत सुविधांचे...

धारावी झोपडपट्टी पुनर्विकास आढावा घेताना मुख्यमंत्री म्हणाले की, धारावी मधील उद्योजकांना स्टेट जीएसटी' मधून सवलत मिळण्याबाबत कार्यवाही करावी. यामुळे धारावीमधील उद्योगांना बळ मिळेल. तेथील 'इन्फॉर्मल इकॉनोमी' ही 'फॉर्मल' होईल. धारावी पुनर्विकाससंदर्भात निविदा प्रक्रियेत असलेल्या विषयांबाबत पुन्हा मंत्रिमंडळासमोर येण्याची आवश्यकता नाही,याबाबत यंत्रणेने संबंधित विभागांशी चर्चा करून समन्वयाने मुद्दे सोडवावेत. ना.म जोशी मार्ग, नायगाव, वरळी येथील बीडीडी चाळींचा पुनर्विकास करताना तेथील रहिवाशांना भाडे देऊन सध्या राहत असलेली घरे विनाविलंब ताब्यात घेत तिथे पुनर्विकास सुरू करावा.

ठाणे ते बोरीवली दुहेरी बोगदा प्रकल्प हा विहित असलेल्या कालमर्यादेत पूर्ण करण्यात यावा. यामध्ये पुढील तीन-तीन महिन्याचे उद्दिष्ट ठेवून काम पूर्णत्वास न्यावे. गोरेगाव ते मुलुंड दुहेरी बोगदा प्रकल्प जानेवारी २०२९ पर्यंत पूर्ण करण्यात यावा. त्यामुळे पश्चिम आणि पूर्व उपनगरांमधील दळणवळण सोयीचे होणार आहे. वांद्रे ते वर्सोवा सागरी सेतू मार्गाच्या कामांमध्ये प्रगती करावी. हा अत्यंत महत्त्वपूर्ण प्रकल्प असून यामधील अडचणी सोडविण्यात याव्यात. पायाभूत सुविधा निर्मिती प्रकल्पांच्या पूर्णत्वासाठी इंधनाचा पुरवठा सुरळीत राहण्याबाबत दक्षता घ्यावी, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, विरार ते अलिबाग या मल्टी मॉडेल कॉरिडोरच्या प्रगतीसाठी भूसंपादनाची प्रक्रिया गतिमान करावी. या मार्गाच्या निर्मितीनंतर आजूबाजूच्या जमिनीचे मूल्य वाढणार आहे. याबाबत संबंधित यंत्रणेने विचार करून या वाढणाऱ्या मूल्याचा शासनाच्या माध्यमातून कशा पद्धतीने उपयोग करता येईल, याबाबत नियोजन करावे. या मार्गाच्या आजूबाजूला काही क्षेत्र निश्चित करून त्या ठिकाणी शासनाने जमिनीची उपलब्धता करून देत गुंतवणूकदाराकडून त्या क्षेत्रावर विशिष्ट उद्योगाचा विकासाबाबत

Printed, Published and Owned by Rakesh Shankar Gore and Printed at Somani Printing Press, Unit no.04, Ground Floor, N.K. Industrial Estate, off. Aarey Road, near Pravasi Ind. Estate, Gate no.2, Goregaon (east) Mumbai-400063, and Published at Shop no. १२, B-2, Sai Dham Shopping Center, Mangal Nagar,१५ No. Last Bus Stop, Near G.C.C. Club, Mira Road (east), Dist: Thane-401107, Maharashtra. Editor- Rakesh Shankar Gore. RNI REG. No: MAHBIL/2023/86118. Office Contact no. 9702386118, Email: dainiklokrakshanay@gmail.com, Website: www.lokrakshanay.com (ठाणे न्याय कक्षेत)

# ठाणे जिल्ह्यातील ४२७ ग्रामपंचायतींमध्ये आरोग्यमंत्र

## ग्रामीण भागात १७५ हून अधिक आरोग्य मेळावे संपन्न; मोफत तपासणीसह कीटकजन्य आजार प्रतिबंधावर भर

ठाणे (रोहित जैसवार) : ग्रामीण भागातील नागरिकांचे आरोग्य अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या 'माझं गाव-आरोग्य संपन्न गाव' अभियानाला ठाणे जिल्ह्यात अभूतपूर्व प्रतिसाद मिळत असून जिल्ह्यातील सर्व ४२७ ग्रामपंचायती या अभियानात सहभागी झाल्या आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील प्रत्येक गावात आता आरोग्याचा मंत्र पोहोचू लागला असून गावागावांत विविध आरोग्यविषयक उपक्रमांची चळवळ उभी राहत आहे. जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजीत यादव यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागाने या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी सुरू केली आहे. ग्रामीण भागात आरोग्यविषयक जनजागृती, तपासणी आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांना गती देण्यात आली आहे.

"माझं गाव –आरोग्य संपन्न गाव " हे महत्त्वाकांक्षी अभियान असून ग्रामीण भागातील नागरिकांचे आरोग्य अधिक सक्षम, सजग आणि निरोगी बनविणे हा त्यामागील मुख्य उद्देश आहे. या अभियानांतर्गत ग्रामपंचायत स्तरावर आरोग्य कृती आराखडा तयार करून मोफत आरोग्य तपासणी, विविध आजारांचे निदान व उपचार, पोषण व स्वच्छतेबाबत जनजागृती, किशोरवयीन आरोग्य उपक्रम, योग प्रशिक्षण, नेत्ररोग व कीटकजन्य




आजार प्रतिबंध मोहीम, तसेच पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण यांसारखे विविध उपक्रम राबविले जात आहेत. स्थानिक प्रशासन, आरोग्य विभाग, आशा स्वयंसेविका आणि ग्रामस्थांच्या सक्रिय सहभागातून गावागावांत आरोग्यदायी वातावरण निर्माण करण्यासाठी हे अभियान प्रभावीपणे राबविले जात आहे.

याच पार्श्वभूमीवर ठाणे जिल्ह्यात हे अभियान राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील सर्व ४२७ ग्रामपंचायतींची नोंदणी झाली असून हे अभियान राबविण्यास सुरुवात झाली आहे. या अभियानाच्या माध्यमातून आतापर्यंत तालुका स्तरावर पाच, प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर ३३ आणि उपकेंद्र स्तरावर १७५ आरोग्य मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यांमध्ये नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी, विविध आजारांचे निदान, उपचार आणि शासनाच्या आरोग्य योजनांची माहिती दिली जात आहे. परिणामी ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता वाढत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

जून महिन्यात अभियानाला आणखी व्यापक स्वरूप देण्यात येणार असून प्रत्येक ग्रामपंचायतीत आरोग्य संपन्न गाव कृती दल समितीच्या बैठका घेऊन स्थानिक गरजांनुसार आरोग्य कृती आराखडा तयार केला जाणार आहे. शाळा आणि अंगणवाड्यांमधील बालकांना स्वच्छता व सकस आहाराचे महत्त्व पटवून देण्याबरोबरच किशोरवयीन मुलामुलींसाठी विशेष आरोग्य मार्गदर्शन, जीवन कौशल्य प्रशिक्षण आणि आरोग्य शिबिरांचे आयोजन केले जाणार आहे. येत्या १० ते १६ जूनदरम्यान जिल्हाभर नेत्ररोग जनजागृती सप्ताह राबविण्यात येणार असून डोळ्यांच्या आरोग्याबाबत विशेष जनजागृती केली जाणार आहे. तसेच पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर डेंग्यू, मलेरिया यांसारख्या कीटकजन्य आजारांच्या प्रतिबंधासाठी व्यापक मोहीम हाती घेण्यात आली आहे.

आरोग्यासोबत पर्यावरण संवर्धनालाही अभियानात महत्त्व देण्यात आले असून गावागावांत वृक्षारोपण कार्यक्रम राबविले जाणार आहेत. निरोगी जीवनशैलीसाठी योगाचे महत्त्व पटवून देत दररोज किमान १०० नागरिकांना योग प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

याशिवाय घरगुती कचऱ्याचे वर्गीकरण, स्वच्छता आणि आरोग्यदायी परिसर निर्मितीसाठी विशेष जनजागृती मोहीमही राबविण्यात येणार आहे. जिल्हा प्रशासन, आरोग्य विभाग, ग्रामपंचायती, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका आणि विविध विभागांच्या समन्वयातून हे अभियान राबविण्यात येत आहे.

# वसईतील केरोसिन वाटपासाठी जिल्हा प्रशासनाच्या मंजूरीची प्रतीक्षा

वसई (सुचिता सोनावणे) : गॅस सिलेंडर नोंदणी प्रक्रियेतील बदलामुळे नागरिकांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी राज्य शासनाकडून अंत्योदय आणि प्राधान्य गट योजनेतील लाभार्थ्यांना केरोसीन पुरवठा करण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र, जिल्हा प्रशासनाकडून अद्यापही वसई तालुक्याला मंजूर केरोसिनचा पुरवठा झाला नसल्याने नागरिकांनी अजून काही काळ प्रतीक्षा करावी लागणार आहे.आखाती देशात सुरू असणाऱ्या युद्धामुळे गॅस सिलेंडर पुरवठ्यावर मोठा परिणाम झाला आहे. यामुळे एकीकडे गॅस सिलिंडरच्या किंमतीत सातत्याने वाढ होत असताना, दुसरीकडे विलंबाने होणारा गॅस सिलेंडर पुरवठा, गॅस



सिलेंडर नोंदणी प्रक्रियेतील बदल यामुळे नागरिक आणि खासकरून ग्रामीण भागातील नागरिक त्रस्त झाले आहेत. त्यामुळे मार्च महिन्यात अन्न आणि नागरी पुरवठा विभागाने यासंदर्भात शासन निर्णय जारी करत प्रति कुटुंब ३ लिटर केरोसीन वितरीत करण्याचे निर्देश दिले होते.हा पुरवठा तात्पुरत्या स्वरूपात करण्यात येणार असून विभागाच्या निर्णयानुसार केरोसिन वितरणात अंत्योदय आणि प्राधान्य गटातील लाभार्थ्यांना केरोसिन देण्यात येणार आहे, असेही स्पष्ट करण्यात आले होते. शासनाकडून पालघर जिल्ह्यासाठी ८४ हजार लिटर आणि वसई तालुक्यासाठी १२ हजार लिटर केरोसिन कोटा मंजूर करण्यात आला आहे. मात्र, अद्याप एकही लाभार्थ्याला केरोसिन पुरवठा करण्यात आलेला नाही. वसई तालुक्यात सद्यस्थितीत प्राधान्य गट योजनेचे एकूण १ लाख ३७ हजार २०२ लाभार्थी आहेत. तर अंत्योदय योजनेचा लाभ घेणारे ३ हजार ७८६ लाभार्थी आहेत. मात्र, केरोसिन न मिळाल्यामुळे गरीब कुटुंबांना स्वयंपाकासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

# देहरंग धरणाची उंची वाढणार

## पनवेल महापालिकेतर्फे प्राथमिक आराखडा तयार

पनवेल (भावना जैन) : शहराची पाण्याची गरज लक्षात घेऊन अप्पासाहेब वेदक अर्थात देहरंग धरणाची उंची वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. धरणाची उंची सध्याच्या पातळीपेक्षा २० मीटरने वाढविल्यास पाणी साठवण क्षमतेत मोठी वाढ होऊन शहराचा दीर्घकालीन पाणीप्रश्न मार्गी लागू शकतो, असा अंदाज पनवेल महापालिका प्रशासनाने व्यक्त केला आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी गाव, वाड्यांतील नागरिकांचे पुनर्वसन आणि १,२०० कोटी रुपयांचा निधी आवश्यक आहे.महापालिकेच्या पाणीपुरवठा व बांधकाम विभागाने यासंदर्भात प्राथमिक आराखडा तयार केला आहे. प्रस्तावित विस्तारानुसार मुख्य बंधाऱ्याची उंची २०




मीटरने वाढविण्यात येणार असून त्यामुळे धरणातून सध्या उपलब्ध असलेल्या पाणीपुरवठ्याच्या तुलनेत जवळपास दहापट अधिक, म्हणजेच प्रतिदिन १३१ एमएलडी पाणी उपलब्ध होऊ शकते. धरण विस्तारासाठी अंदाजे १,००० कोटी रुपये खर्च अपेक्षित असून धरणातील पाणी शहरापर्यंत पोहोचविण्यासाठी स्वतंत्र जलवाहिनी योजनेसाठी आणखी २०० कोटी रुपयांची आवश्यकता भासणार आहे.सध्या देहरंग धरणाचे क्षेत्रफळ १५ हेक्टर असून त्याची साठवण क्षमता ३.५७ दशलक्ष घनमीटर आहे. विस्तारानंतर ही क्षमता ३७.८१ दशलक्ष घनमीटरपर्यंत वाढू शकते. त्यासाठी अतिरिक्त २१४ हेक्टर जमीन संपादित करावी लागणार आहे. प्रस्तावित विस्तारित जलक्षेत्रामुळे टावरेवाडी, मालडुंगे तसेच परिसरातील काही आदिवासी वाड्या आणि शेतघरे प्रभावित होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुनर्वसन हा प्रकल्पातील महत्त्वाचा घटक ठरणार आहे.

# भाईंदरमध्ये टोमॅटो विक्रेत्याने केली हत्या

भाईंदर (प्रतिनिधी) : टोमॅटोच्या कॅरेटवरून झालेल्या किरकोळ वादात एका भाजी विक्रेत्याचा मृत्यू झाल्याची घटना भाईंदर मध्ये घडली आहे. या संदर्भात नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संतोष लल्लन सिंह असे मृत्यू झालेल्या भाजी विक्रेत्याचे नाव आहे. २९ मे रोजी सकाळी सुमारे दहा वाजण्याच्या सुमारास हनुमान मंदिराजवळील भाजी मार्केटमध्ये टोमॅटोच्या क्रेटवरून दोन विक्रेत्यांमध्ये वाद झाला होता. वाद वाढल्यानंतर धीरज गुप्ता याने



संतोष लल्लन सिंह यांच्यावर लोखंडी रॉडने हल्ला केल्याचा आरोप आहे.

या हल्ल्यात संतोष सिंह गंभीर जखमी झाले.जखमी अवस्थेत त्यांना प्रथम जैन रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर प्रकृती गंभीर झाल्याने पुढील उपचारासाठी मीरा रोड येथील वॉकहार्ट रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र उपचार सुरू असतानाच २ जून रोजी सकाळी त्यांचा मृत्यू झाला.या प्रकरणी मृत संतोष सिंह यांचे भाऊ मनोज लल्लन सिंह यांनी नवघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी धीरज गुप्ता, रोशन गुप्ता, राजन गुप्ता आणि अंजित गुप्ता या चौघांना अटक केली आहे.

चारही आरोपींविरोधात भारतीय न्याय संहिता (बीएनएस) अंतर्गत विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रकरणाचा पुढील तपास नवघर पोलीस करत आहेत.

# शासकीय कार्यालयांना भ्रष्टाचाराचे ग्रहण!

## दीड वर्षात १८ अधिकारी-कर्मचारी एसीबीच्या जाळ्यात

वसई (प्रतिनिधी) : जनतेच्या सेवेसाठी आणि जिल्ह्याच्या विकासासाठी स्थापन झालेली पालघरमधील शासकीय कार्यालये सध्या भ्रष्टाचाराच्या दलदलीत रुतल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. सर्वसामान्यांची कामे अडवून ठेवायची आणि ती करण्यासाठी टेबलाखालून पाकिटे स्वीकारायची, हा जणू इथल्या काही प्रशासकीय अधिकाऱ्यांचा अधिकृत शिरस्ता बनला आहेत. मागील दीड वर्षात जिल्ह्यातील विविध शासकीय कार्यालयात एसीबीने टाकलेल्या धाडीत १८ अधिकारी व कर्मचारी जाळ्यात अडकले आहेत.

पालघर जिल्हा हा मागील काही वर्षापासून झपाट्याने विकसित होऊ



लागला आहे. त्यामुळे विविध प्रकारची शासकीय कामानिमित्त मोठ्या संख्येने नागरिक शासकीय कार्यालयात जात असतात. मात्र अनेकदा शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी यांच्या मार्फत त्यांचे काम अडवून ठेवले जाते तर कधी कधी लाचेची मागणी केली जाते. त्यामुळे पालघर जिल्ह्यातील विविध ठिकाणच्या शासकीय कार्यालयात सर्वसामान्य नागरिकांची कामे करवून घेण्यासाठी लाच घेण्याचे प्रकार समोर येत आहेत.

'लाच स्वीकारणे हा गुन्हा आहे', असे फलक शासकीय कार्यालयात लावलेले दिसतात तरी सुद्धा लाचखोरी थांबले नाहीत.अवघ्या सव्वा महिन्यातच वसई विरार शहरात लाचखोरीची चार प्रकरणे ठाणे व पालघर एसीबीच्या पथकाने उघड केली आहेत. या कारवाईवरूनच शासकीय कार्यालयातील भ्रष्टाचाराची पाळेमुळे अगदी खोलवर गेली असल्याचे समोर येत आहे.

२०२५ ते चालू वर्ष २०२६ वर्षात पालघर जिल्ह्यात विविध शासकीय आस्थापनेतील १७ लाचखोरांवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने सापळा रचून कारवाई केली आहेत. यात महसूल विभाग ४, महावितरण ३, आरोग्य विभाग ३, वनविभागाचे २, ग्रामविकास विभाग २, पोलीस विभाग १, सरकारी वकील १, सरपंच १ असे लाचखोर जाळ्यात अडकले आहेत.यात सर्वाधिक सापळे हे वसई विरार टाकण्यात आले होते.या लाचखोरांविरोधात न्यायालयात दोषारोपत्र पाठविले पासून त्या प्रकरणाचा केसचा अंतिम निकाल लागेपर्यंत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून पाठपुरावा केला जात आहे असे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधीक्षक दादाराम कारंडे यांनी सांगितले आहे.

# अवैध शौचालयाच्या बांधकामावरील कारवाईनंतर राजकारण तापले

पनवेल (धनश्री सट्टा) : खारघरमधील उत्सव चौक परिसरात सिडकोची अंतिम बांधकाम परवानगी मिळण्यापूर्वी उभारण्यात आलेले सार्वजनिक शौचालय सिडकोच्या अतिक्रमण नियंत्रण विभागाने बुधवारी जमीनदोस्त केल्यानंतर पनवेलमधील राजकीय वातावरण तापले आहे. या कारवाईनंतर महापालिकेच्या कार्यपद्धतीवर विरोधकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, प्रशासनाने यासाठी कंत्राटदाराला जबाबदार धरले आहे. तर महापौरांनी परवानगीपूर्वी काम सुरू करणे चुकीचे असल्याचे मान्य करतानाच सिडकोकडून परवानगी प्रक्रियेत होणाऱ्या विलंबाकडेही लक्ष वेधले आहे.

उत्सव चौक ते मंकी पॉईंट परिसर विकास योजनेअंतर्गत सार्वजनिक स्वच्छतागृह उभारण्याचा प्रस्ताव पनवेल महापालिकेने तयार केला होता. यापैकी उत्सव चौकात



शौचालयाच्या बांधकामासाठी सूमारे ५० लाखांचा खर्च करण्यासाठी अशोका डेव्हलपर्स या कंपनीला कंत्राट देण्यात आले. मात्र संबंधित जागा सिडकोच्या मालकीची असल्याने आणि खारघरमध्ये सिडको हेच नियोजन प्राधिकरण असल्याने या कामासाठी सिडकोची अंतिम परवानगी आवश्यक होती. महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत तीन महिन्यांपूर्वी सार्वजनिक शौचालय असल्याने सवलत मिळावी यासाठी सिडकोकडे महापालिकेने अर्ज दाखल केला. मात्र त्यावर कोणतीही सवलत दिली गेली नाही. बुधवारी हे अवैध बांधकाम पाडल्यानंतर पनवेलचे राजकारण ढवळून निघाले.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या नगरसेविका व गटनेत्या लीना गरड यांनी या प्रकरणावरून सत्ताधारी पक्ष आणि प्रशासनावर टीका केली आहे. सिडकोच्या जागेवर आवश्यक परवानगी न घेता बांधकाम करण्यात आले. त्यासाठी बैठका घेऊन प्रस्ताव मंजूर करण्यात आला, निविदा काढण्यात आल्या आणि प्रत्यक्ष आरसीसी बांधकामही पूर्ण करण्यात आले. त्यानंतर सिडकोने कारवाई करून बांधकाम हटविल्याने जनतेच्या पैशांचा अपव्यय झाला असल्याचा आरोप त्यांनी केला. या नुकसानीची जबाबदारी निश्चित करून संबंधित अधिकाऱ्यांकडून वसुली केली जाणार का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

# सिद्धेश्वर एक्सप्रेसमध्ये कोट्यवधींचा डल्ला टाकणारी टोळी अखेर गजाआड

कल्याण (प्रतिनिधी) : सोलापूर–कल्याण दरम्यान धावणाऱ्या सिद्धेश्वर एक्स्प्रेसमध्ये झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या दागिने चोरीप्रकरणी कल्याण रेल्वे गुन्हे शाखेला मोठे यश मिळाले आहे. या बहुचर्चित प्रकरणातील चौथा आरोपी पुणेकर उर्फ शिवया डिकोले याला अटक करण्यात आली असून त्याच्याकडून तब्बल १ कोटी २७ लाख रुपयांची सोन्याची बिस्किटे जप्त करण्यात आली आहेत.

डिसेंबर २०२५ मध्ये मुंबईतील सराफ व्यावसायिक अभयकुमार मदनलाल जैन आणि त्यांची मुलगी तनिष्का जैन हे सोलापूरहून दागिन्यांचा व्यवसाय आटोपून सिद्धेश्वर एक्स्प्रेसने मुंबईकडे येत होते. त्यांच्या ट्रॉली बॅगेत सुमारे ४.७ किलो वजनाचे सोन्याचे दागिने होते. बॅगा सीटखाली साखळीने बांधून कुलूप लावलेले



असतानाही अज्ञात चोरट्यांनी चलाखीने दोन्ही बॅगा लंपास केल्या. सकाळी जाग आल्यानंतर बॅगा चोरीला गेल्याचे लक्षात येताच त्यांनी कल्याण रेल्वे पोलिसांकडे तक्रार दाखल केली होती.

तपासादरम्यान पोलिसांनी यापूर्वी तीन आरोपींना अटक केली होती. आता शिवया डिकोले याच्या अटकेनंतर या प्रकरणातील अटक आरोपींची संख्या चारवर पोहोचली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चोरीनंतर आरोपींनी दागिने वितळवून त्यांचे सोन्याच्या बिस्किटांमध्ये रूपांतर केले होते. चोरीचा माल ओळखता येऊ नये आणि पुरावे नष्ट करता यावेत यासाठी हा डाव आखण्यात आला होता.

आतापर्यंत पोलिसांनी चार आरोपींकडून एकूण १ कोटी ६२ लाख रुपयांची सोन्याची बिस्किटे जप्त केली आहेत. मात्र या गुन्ह्यातील आणखी सहा आरोपी अद्याप फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. तसेच चोरीस गेलेल्या मालापैकी अजूनही सुमारे अडीच ते तीन कोटी रुपयांचे दागिने हस्तगत करायचे असल्याची माहिती तपास अधिकाऱ्यांनी दिली .सहा महिन्यांनंतरही सुरू असलेल्या या तपासामुळे रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. फरार आरोपींच्या अटकेनंतर या आंतरराज्यीय चोरीच्या रॅकेटचे आणखी धागेदोरे समोर येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

# पर्यावरणसंवर्धन, शाश्वत विकास आणि मानवजातीचे भविष्य

**मानव आणि निसर्ग यांचे नाते हे सृष्टीच्या निर्मितीइतकेच प्राचीन आहे. पृथ्वीवरील जीवनाची संपूर्ण व्यवस्था पर्यावरणावर आधारलेली आहे. हवा, पाणी, माती, वनस्पती, प्राणी, पर्वत, नद्या, समुद्र, जंगल आणि वातावरणातील विविध घटक यांच्या परस्पर संबंधातून पर्यावरणाची निर्मिती होते. पर्यावरण हा केवळ एक शब्द नसून तो जीवनाचा पाया आहे. आपण घेत असलेला प्रत्येक श्वास, आपण पित असलेले पाणी, आपण खात असलेले अन्न आणि आपल्या जीवनासाठी आवश्यक असलेली प्रत्येक नैसर्गिक गोष्ट पर्यावरणातूनच प्राप्त होते. म्हणूनच पर्यावरणाचे संरक्षण म्हणजे मानवाच्या अस्तित्वाचे संरक्षण होय. परंतु गेल्या काही दशकांमध्ये विज्ञान, तंत्रज्ञान, औद्योगिकीकरण आणि शहरीकरणाच्या झपाट्याने झालेल्या विस्तारामुळे पर्यावरणावर अभूतपूर्व ताण निर्माण झाला आहे. विकासाच्या नावाखाली नैसर्गिक संसाधनांचा अविचारी वापर, जंगलतोड, प्रदूषण, जैवविविधतेचा ऱ्हास आणि हवामान बदल यांसारख्या समस्या गंभीर बनल्या आहेत. या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी आणि जनजागृती निर्माण करण्यासाठी दरवर्षी ५ जून हा दिवस 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून साजरा केला जातो.**

जागतिक पर्यावरण दिन हा जगातील सर्वात मोठा पर्यावरणीय जनजागृती उपक्रम मानला जातो. संयुक्त राष्ट्रसंघाच्या पुढाकारातून या दिवसाची सुरुवात झाली. १९७२ साली स्वीडनमधील स्टॉकहोम येथे 'मानवी पर्यावरण परिषद' आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत पर्यावरण संरक्षणाची गरज आणि विकासासोबत पर्यावरणाचा समतोल राखण्याचे महत्त्व जगासमोर मांडण्यात आले. या परिषदेनंतर संयुक्त राष्ट्रसंघाने ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून घोषित केला. १९७४ पासून या दिवसाचे औपचारिक आयोजन सुरू झाले. तेव्हापासून दरवर्षी विविध देशांमध्ये पर्यावरण संवर्धनाच्या विविध विषयांवर आधारित कार्यक्रम, मोहिमा, परिसंवाद, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान आणि जनजागृती उपक्रम आयोजित केले जातात. या दिवसाचा मुख्य उद्देश लोकांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करणे, पर्यावरणीय समस्यांकडे लक्ष वेधणे आणि पर्यावरण संरक्षणासाठी कृती करण्यास प्रेरित करणे हा आहे.

पर्यावरणाचे महत्त्व समजून घेताना आपण हे लक्षात घेतले पाहिजे की मानव हा निसर्गाचा स्वामी नसून त्याचा एक अविभाज्य घटक आहे. निसर्गातील प्रत्येक घटकाचे विशिष्ट कार्य असते. जंगल कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात आणि प्राणवायू निर्माण करतात. नद्या आणि जलस्रोत मानवाला पाणी उपलब्ध करून देतात. माती अन्नधान्य उत्पादनासाठी आवश्यक असते. विविध प्राणी आणि कीटक परिसंस्थेचे संतुलन राखण्यास मदत करतात. या सर्व घटकांमधील सुसंवादामुळे पृथ्वीवरील जीवन शक्य झाले आहे. परंतु मानवाने आपल्या गरजा आणि सुखसोयी वाढविण्यासाठी निसर्गाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला. परिणामी पर्यावरणीय संतुलन बिघडले आणि आज जग अनेक गंभीर संकटांचा सामना करत आहे.

आजच्या काळातील सर्वात मोठी पर्यावरणीय समस्या म्हणजे हवामान बदल. औद्योगिक क्रांतीनंतर जीवाश्म इंधनांचा वापर प्रचंड प्रमाणात वाढला. कोळसा, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू यांच्या ज्वलनामुळे वातावरणात कार्बन डायऑक्साइड आणि इतर हरितगृह वायूंचे प्रमाण वाढले. हे वायू पृथ्वीभोवती उष्णतेचे आवरण निर्माण करतात आणि त्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढते. या प्रक्रियेला जागतिक तापमानवाढ असे म्हणतात. जागतिक तापमानवाढीमुळे हिमनद्या वितळत आहेत, समुद्राची पातळी वाढत आहे, हवामानातील बदल तीव्र होत आहेत आणि नैसर्गिक आपत्तींची संख्या वाढत आहे. जगभरात दुष्काळ, पूर, उष्णतेच्या लाटा, जंगलातील आगी आणि चक्रीवादळे अधिक वारंवार घडू लागली आहेत. हवामान बदलाचा परिणाम केवळ पर्यावरणावरच नव्हे तर शेती, आरोग्य, अर्थव्यवस्था आणि सामाजिक जीवनावरही होत आहे.

जंगल हे पृथ्वीचे फुफ्फुस मानले जाते. जंगलांमुळे वातावरणातील कार्बनचे प्रमाण नियंत्रित राहते, पावसाचे चक्र सुरळीत राहते आणि जैवविविधतेचे संरक्षण होते. पृथ्वीवरील लाखो वनस्पती आणि प्राणी जंगलांमध्ये आश्रय घेतात. परंतु वाढत्या शहरीकरणामुळे, खाणकामामुळे, औद्योगिक प्रकल्पांमुळे आणि विकासकामांमुळे मोठ्या प्रमाणावर जंगलतोड होत आहे. जंगलांचा ऱ्हास झाल्याने वन्यजीवांचे अधिवास नष्ट होत आहेत आणि अनेक प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. जंगलतोडीमुळे वातावरणातील कार्बनचे प्रमाण वाढते आणि हवामान बदलाची समस्या अधिक गंभीर बनते. त्यामुळे वृक्षारोपण आणि वनसंवर्धन हे पर्यावरण संरक्षणाचे अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत.

जलसंपदा ही मानवाच्या जीवनासाठी अत्यावश्यक आहे. पाणी नसल्यास जीवन अशक्य आहे. परंतु आज जगभरात जलसंकट तीव्र होत आहे. लोकसंख्या वाढ, औद्योगिकीकरण, शेतीसाठी होणारा अतिवापर आणि पाण्याचे अयोग्य व्यवस्थापन यांमुळे अनेक भागांमध्ये पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. नद्या आणि तलावांमध्ये औद्योगिक सांडपाणी, प्लास्टिक कचरा आणि रासायनिक पदार्थ मिसळल्यामुळे जलप्रदूषण वाढत आहे. भूजलपातळी झपाट्याने खाली जात आहे. भारतातील अनेक राज्यांमध्ये उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण होते. भविष्यात पाणी हे संघर्षाचे प्रमुख कारण ठरू शकते, अशी भीती व्यक्त केली जाते. त्यामुळे जलसंधारण, पावसाचे पाणी साठवणे, जलप्रदूषण नियंत्रण आणि पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे.

वायुप्रदूषण ही आधुनिक जगासमोरील आणखी एक गंभीर समस्या आहे. वाहनांचा धूर, कारखान्यांमधून होणारे उत्सर्जन, वीजनिर्मितीसाठी वापरले जाणारे जीवाश्म इंधन आणि कचरा जाळण्याच्या प्रक्रियेमुळे वातावरणात घातक वायूंचे प्रमाण वाढत आहे. वायुप्रदूषणामुळे दमा, फुफ्फुसांचे आजार, हृदयरोग आणि कर्करोगासारखे गंभीर आजार वाढत आहेत. अनेक महानगरांमध्ये हवेची गुणवत्ता धोकादायक पातळीवर पोहोचली आहे. स्वच्छ हवा ही मानवाचा मूलभूत अधिकार आहे. त्यामुळे स्वच्छ ऊर्जा, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञान यांचा वापर वाढविणे आवश्यक आहे.

प्लास्टिक प्रदूषण हा पर्यावरणासाठी वाढता धोका आहे. प्लास्टिकच्या वापरामुळे अनेक सुविधा निर्माण झाल्या असल्या तरी त्याचे दुष्परिणाम अत्यंत गंभीर आहेत. प्लास्टिक सहज विघटित होत नाही. त्यामुळे ते जमिनीमध्ये, नद्यांमध्ये आणि समुद्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर साचते. समुद्रातील प्लास्टिक कचऱ्यामुळे सागरी जीवांचे मोठे नुकसान होत आहे. अनेक पक्षी आणि प्राणी प्लास्टिक गिळल्यामुळे मृत्युमुखी पडतात. सूक्ष्म प्लास्टिकचे कण आता मानवी शरीरातही प्रवेश करू लागले आहेत. त्यामुळे एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकचा वापर कमी करणे आणि पर्यावरणपूरक पर्यायांचा स्वीकार करणे आवश्यक आहे.पर्यावरणीय संतुलन टिकविण्यासाठी जैवविविधतेचे संरक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. पृथ्वीवरील वनस्पती, प्राणी आणि सूक्ष्मजीव यांची विविधता म्हणजे जैवविविधता. जैवविविधतेमुळे परिसंस्था कार्यरत राहतात आणि मानवाला अन्न, औषधे, इंधन तसेच इतर अनेक संसाधने उपलब्ध होतात. परंतु अधिवासांचा नाश, प्रदूषण, हवामान बदल आणि नैसर्गिक संसाधनांचे अतिरेकी शोषण यांमुळे अनेक प्रजाती धोक्यात आल्या आहेत. जैवविविधतेचा ऱ्हास हा पर्यावरणीय संकटाचा एक महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे वन्यजीव संरक्षण, अभयारण्ये आणि राष्ट्रीय उद्यानांचे संवर्धन आवश्यक आहे.

भारत हा जैवविविधतेने समृद्ध देश आहे. हिमालय, पश्चिम घाट, सुंदरबन, ईशान्य भारतातील जंगले आणि राजस्थानचे वाळवंट या विविध परिसंस्था भारतात आढळतात. भारतीय संस्कृतीत निसर्गाला विशेष स्थान आहे. वृक्षपूजन, नदीपूजन आणि प्राण्यांप्रती आदरभाव या परंपरा पर्यावरणपूरक जीवनशैलीचे प्रतीक आहेत. ऋषी-मुनींनी निसर्गाशी सुसंवाद साधून जीवन जगण्याचा संदेश दिला आहे. आजच्या काळात या मूल्यांचे पुनरुज्जीवन करणे आवश्यक आहे.

पर्यावरण संरक्षणामध्ये शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पर्यावरण शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण होते. पर्यावरणीय समस्यांची जाणीव, संसाधनांचा योग्य वापर आणि पर्यावरणपूरक सवयी यांचा विकास शिक्षणाद्वारे होतो. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, जलसंधारण आणि कचरा व्यवस्थापन यांसारखे उपक्रम राबविले जातात. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संरक्षणाची भावना विकसित होते.

विज्ञान आणि तंत्रज्ञान पर्यावरण संरक्षणासाठी महत्त्वाचे साधन ठरू शकतात. सौरऊर्जा, पवनऊर्जा, जैवऊर्जा आणि जलऊर्जा यांसारख्या नूतनीकरणक्षम ऊर्जास्रोतांचा वापर वाढविल्यास कार्बन उत्सर्जन कमी करता येते. इलेक्ट्रिक वाहने, ऊर्जा कार्यक्षम उपकरणे, हरित इमारती आणि स्मार्ट तंत्रज्ञान यांचा वापर पर्यावरण संरक्षणासाठी उपयुक्त आहे. तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास विकास आणि पर्यावरण संवर्धन यांचा समतोल राखता येऊ शकतो.

कचरा व्यवस्थापन हा पर्यावरण संवर्धनाचा महत्त्वाचा भाग आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे आणि उपभोगवादी जीवनशैलीमुळे कचऱ्याचे प्रमाण वाढत आहे. योग्य व्यवस्थापन न झाल्यास कचरा पर्यावरणासाठी गंभीर धोका निर्माण करतो. घरगुती स्तरावर कचऱ्याचे वर्गीकरण, पुनर्वापर, पुनर्निर्मिती आणि सेंद्रिय कचऱ्यापासून खत निर्मिती यांसारख्या उपाययोजना प्रभावी ठरू शकतात. 'कमी वापरा, पुनर्वापर करा आणि पुनर्निर्मिती करा' हे तत्त्व पर्यावरण संरक्षणासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

शेती आणि पर्यावरण यांचा घनिष्ठ संबंध आहे. रासायनिक खते आणि कीटकनाशकांच्या अतिरेकी वापरामुळे जमिनीची सुपीकता कमी होत आहे. जलप्रदूषण वाढत आहे आणि जैवविविधतेवर परिणाम होत आहे. सेंद्रिय शेती, नैसर्गिक शेती आणि शाश्वत कृषी पद्धती पर्यावरण संवर्धनासाठी उपयुक्त ठरतात. जलसंधारण, मृदसंवर्धन आणि स्थानिक संसाधनांचा योग्य वापर यांमुळे शेती अधिक शाश्वत बनू शकते.पर्यावरण संरक्षणासाठी शासन, उद्योग, स्वयंसेवी संस्था आणि नागरिक यांचे संयुक्त प्रयत्न आवश्यक आहेत. विविध कायदे, धोरणे आणि कार्यक्रमांच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचे प्रयत्न सुरू आहेत. परंतु केवळ सरकारी यंत्रणांवर अवलंबून राहून चालणार नाही. प्रत्येक नागरिकाने पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे आवश्यक आहे. पाणी वाचवणे, वीज बचत करणे, झाडे लावणे, सार्वजनिक वाहतुकीचा वापर करणे आणि प्लास्टिकचा वापर टाळणे यांसारख्या छोट्या कृती मोठा बदल घडवू शकतात.

शाश्वत विकास ही आजच्या काळातील सर्वात महत्त्वाची संकल्पना आहे. वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम होणार नाही, अशा प्रकारे विकास करणे म्हणजे शाश्वत विकास होय. आर्थिक प्रगती आणि पर्यावरण संवर्धन यांचा समतोल राखणे ही काळाची गरज आहे. पर्यावरणीय न्याय, संसाधनांचे समान वाटप आणि हरित विकास या संकल्पनांवर भर देणे आवश्यक आहे .पर्यावरणीय संकटे ही कोणत्याही एका देशापुरती मर्यादित नाहीत. हवामान बदल, प्रदूषण आणि जैवविविधतेचा ऱ्हास या समस्या जागतिक स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि सामूहिक प्रयत्न आवश्यक आहेत. विकसित आणि विकसनशील देशांनी समान जबाबदारी स्वीकारून पर्यावरण संरक्षणासाठी कार्य करणे गरजेचे आहे.

जागतिक पर्यावरण दिन हा आपल्याला एक महत्त्वपूर्ण संदेश देतो की पृथ्वी ही केवळ आपल्या पिढीची मालमत्ता नाही. ती भावी पिढ्यांसाठी जपण्याची अमूल्य ठेव आहे. पर्यावरणाचे रक्षण करणे म्हणजे भविष्याचे रक्षण करणे होय. प्रत्येक झाड, प्रत्येक नदी, प्रत्येक सजीव आणि प्रत्येक नैसर्गिक संसाधन पृथ्वीच्या अस्तित्वासाठी महत्त्वाचे आहे. पर्यावरण संवर्धन ही केवळ जबाबदारी नाही तर मानवतेप्रती असलेली नैतिक बांधिलकी आहे .आजच्या जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आपण सर्वांनी पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारण्याचा, नैसर्गिक संसाधनांचा जबाबदारीने वापर करण्याचा आणि पृथ्वीला अधिक हरित, स्वच्छ व सुरक्षित बनविण्याचा दृढ संकल्प करणे आवश्यक आहे. पर्यावरणाचे रक्षण ही केवळ शासनाची किंवा काही संस्थांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. आपल्या छोट्या-छोट्या कृतींमधून मोठा बदल घडू शकतो. निसर्गाशी सुसंवाद साधून, शाश्वत विकासाचा मार्ग स्वीकारून आणि पर्यावरण संवर्धनाला जीवनाचा अविभाज्य भाग बनवूनच आपण उज्ज्वल, सुरक्षित आणि समृद्ध भविष्याची निर्मिती करू शकतो. म्हणूनच या जागतिक पर्यावरण दिनी एकच संदेश सर्वत्र पोहोचला पाहिजे तो म्हणजे "पर्यावरण वाचवा, पृथ्वी वाचवा आणि मानवजातीचे भविष्य सुरक्षित करा."

डॉ. राजेंद्र बगाटे
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)


# जागतिक पर्यावरण दिनाने मला स्वतःविषयी एक प्रश्न विचारायला भाग पाडले

## पृथ्वीचे रक्षण करण्यापूर्वी आपण कोणत्या प्रकारचा माणूस बनत आहोत?

दरवर्षी जागतिक पर्यावरण दिन आला की आपल्या आसपास काही परिचित संदेश ऐकू येतात.पाणी वाचवा .झाडे लावा .प्लास्टिकचा वापर कमी करा .निसर्गाचे संरक्षण करा .हे संदेश नक्कीच महत्त्वाचे आहेत. गेल्या अनेक वर्षांत मी स्वत: विविध पर्यावरणीय उपक्रमांमध्ये सहभागी झालो आहे. समुदायांशी संवाद साधला आहे, शाळांमध्ये काम केले आहे, शेतकऱ्यांशी चर्चा केली आहे, कचरा व्यवस्थापनाच्या पद्धती समजून घेतल्या आहेत आणि मानवी वर्तन व पर्यावरण यांच्यातील नाते समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

पण एक गोष्ट मला अलीकडच्या काळात अधिक जाणवू लागली आहे. वय वाढत गेले तसे जागतिक पर्यावरण दिन माझ्यासाठी केवळ पर्यावरणीय कार्यक्रम राहिला नाही. तो आत्मपरीक्षणाचा दिवस बनला. असा दिवस, जेव्हा मी स्वत :लाच एक साधा पण अस्वस्थ करणारा प्रश्न विचारतो .हा प्रश्न निसर्गाबद्दल नाही. हवामान बदलाबद्दल नाही. प्रदूषणाबद्दलही नाही.

तो प्रश्न आहे —"मी कोणत्या प्रकारचा माणूस बनत आहे?"जीवनाच्या सुरुवातीच्या काळात हा प्रश्न मी स्वत :ला कधी विचारला नव्हता .आपल्यापैकी अनेकांप्रमाणे मीही यश, जबाबदाऱ्या, उद्दिष्टे, वेळेच्या मर्यादा आणि अपेक्षा यांच्यामध्ये जीवनाचे मोजमाप करत होतो. काहीतरी साध्य करायचे होते. काहीतरी निर्माण करायचे होते. भविष्यासाठी तयारी करायची होती. जीवन सतत धावत होते.आणि त्या धावपळीत एक दिवस मला निसर्गामध्ये एक विलक्षण गोष्ट दिसली .निसर्गाला घाई नसते. गावातील शाळेजवळचा कडुनिंबाचा वृक्ष वाढण्यासाठी धावत नाही .नदी दुसऱ्या नदीशी स्पर्धा करत नाही. माती अन्न निर्माण केल्याबद्दल कौतुकाची अपेक्षा करत नाही. निसर्गातील प्रत्येक घटक शांतपणे आपली भूमिका पार पाडत असतो. टाळ्यांशिवाय .प्रसिद्धीशिवाय. अपेक्षांशिवाय .हे निरीक्षण मनात कायमचे राहिले .कारण माणूस मात्र अनेकदा वेगळ्या पद्धतीने जगतो. आपल्याला ओळख हवी असते. कौतुक हवे असते .आपले नाव लक्षात राहावे असे वाटत असते .यात काही चुकीचे नाही .पण कधी कधी मला वाटते की आपण जीवनाने आपल्यासाठी काय करावे, हा प्रश्न इतक्या वेळा विचारतो की आपण जीवनासाठी काय करत आहोत, हा प्रश्न विचारायलाच विसरतो .काही वर्षांपूर्वी एका वृद्ध शेतकऱ्याला भेटण्याची संधी मिळाली .ते श्रीमंत नव्हते .त्यांच्याकडे कोणतेही मोठे पद नव्हते .त्यांचे नाव कदाचित कधीच वर्तमानपत्रात झळकणार नव्हते. शेती, पाऊस आणि बदलते ऋतू यांवर बोलत असताना त्यांनी त्यांच्या




शेताजवळील एका विशाल वृक्षाकडे बोट दाखवले."हे झाड मी माझी मुले लहान असताना लावले होते," ते म्हणाले.

तो वृक्ष आता प्रचंड मोठा झाला होता.त्याच्या सावलीत प्रवासी विश्रांती घेत होते.पक्षी त्याच्या फांद्यांवर विसावत होते.उन्हाळ्यात अनेकांना त्याचा आधार मिळत होता. शेतकरी हसले आणि सहजपणे म्हणाले,"मला माहीत होते की या झाडाच्या सावलीचा बहुतांश लाभ मला मिळणार नाही. पण कोणाला तरी मिळेल."संवाद काही क्षणांचाच होता.पण त्या वाक्याने मला जबाबदारीचा खरा अर्थ शिकवला. कदाचित जबाबदारी म्हणजे हेच — स्वत :ला त्याचा लाभ मिळणार नाही हे माहिती असूनही काहीतरी मूल्यवान निर्माण करणे .आजच्या जगात आपण त्वरित परिणामांच्या सवयीचे झालो आहोत .त्वरित सुविधा .त्वरित समाधान .त्वरित यश .आपल्याला प्रतीक्षा करणे कठीण वाटते. अनिश्चितता स्वीकारणे कठीण वाटते .आपण पाहू शकणार नाही अशा भविष्यामध्ये गुंतवणूक करणे कठीण वाटते .पण निसर्ग वेगळ्या तत्त्वांवर कार्य करतो .आज पिकांना पोषण देणारी माती आपल्यापूर्वी तयार झाली होती .आज सावली देणारी अनेक झाडे ती लावणाऱ्या लोकांनंतरही उभी आहेत .आज समाजाला आधार देणाऱ्या अनेक जलव्यवस्था पूर्वीच्या पिढ्यांनी जपल्या होत्या .आपण अनेक अशा निर्णयांचे लाभार्थी आहोत जे आपल्यासाठी नव्हे, तर भविष्यासाठी घेतले गेले होते.

मग प्रश्न असा आहे —आपणही तेच करत आहोत का?पर्यावरणवादी म्हणून नाही .धोरणकर्ते म्हणून नाही. कार्यकर्ते म्हणून नाही .तर फक्त माणूस म्हणून .कधी कधी मला वाटते की सर्वात मोठे पर्यावरणीय संकट पृथ्वीच्या बाहेर नाही .ते आपल्या आत आहे .कृतज्ञतेचा हळूहळू कमी होत जाणारा भाव .जबाबदारीची कमी होत जाणारी जाणीव .आणि आपण स्वत :पेक्षा खूप मोठ्या व्यवस्थेचा भाग आहोत, ही जाणीव हरवत जाणे. या लेखमालेत मी निसर्गापासून तुटत चाललेल्या नात्याबद्दल लिहिले .मानवी वर्तनाबद्दल लिहिले. परस्परावलंबनाबद्दल लिहिले .अन्न आणि भावी पिढ्यांबद्दल लिहिले .पण या सर्व विचारांचा शेवट एका ठिकाणी येऊन थांबतोव्यक्तिमत्त्व .कारण प्रत्येक पर्यावरणीय प्रश्न शेवटी मानवी प्रश्न बनतो .कचरा वर्तनाचे प्रतिबिंब असतो .पाणी जबाबदारीचे प्रतिबिंब असते .अन्न परस्परावलंबनाचे प्रतिबिंब असते. शाश्वतता मूल्यांचे प्रतिबिंब असते. आणि पृथ्वी ?पृथ्वी एक आरसा बनते .जो शांतपणे दाखवत असतो की आपण खरोखर कोण आहोत. म्हणूनच आज जागतिक पर्यावरण दिन मला मोहिमेसारखा वाटत नाही. तो थांबण्याची संधी वाटतो .स्वत :कडे प्रामाणिकपणे पाहण्याची संधी वाटते. मी घेतो त्यापेक्षा अधिक मूल्य निर्माण करतो आहे का, हा प्रश्न विचारण्याची संधी वाटते .माझे निर्णय पुढील पिढ्यांचे जीवन सोपे करत आहेत की कठीण, हा प्रश्न विचारण्याची संधी वाटते .मी पृथ्वीचा मालक म्हणून जगतो आहे की तिचा तात्पुरता संरक्षक म्हणून, हा प्रश्न विचारण्याची संधी वाटते .माझ्याकडे या सर्व प्रश्नांची परिपूर्ण उत्तरे नाहीत.

पण निसर्गाने मला एक गोष्ट शिकवली आहे —जीवन नात्यांमधून टिकते .माती आणि बियाण्यामधील नाते .पाणी आणि जंगलांमधील नाते. परागीकरण करणारे जीव आणि शेतीमधील नाते .एका पिढीचे पुढील पिढीशी असलेले नाते .आणि कदाचित सर्वात महत्त्वाचे नाते म्हणजे कृतज्ञता आणि जबाबदारी यांच्यातील नाते. कारण कृतज्ञता संपली की जबाबदारी ओझे वाटते .पण कृतज्ञता जिवंत असेल तर जबाबदारी स्वाभाविक बनते .एक दिवस आपण सर्वजण या जगातून जाणार आहोत .आपली पदे मागे राहतील .आपली संपत्ती इतरांच्या मालकीची होईल .आपली यशोगाथा हळूहळू विस्मरणात जाईल .पण आपण कसे जगलो याचे परिणाम पुढे जात राहतील .भावी पिढ्यांना कदाचित आपली नावे माहीत नसतील.

पण त्यांनी आपले निर्णय वारशाने स्वीकारायचे असतील .म्हणूनच कदाचित जागतिक पर्यावरण दिन आपल्याला निसर्गाविषयी नव्हे, तर जीवनाविषयी प्रश्न विचारतो .कारण पृथ्वीचे रक्षण करणे म्हणजे केवळ ग्रह वाचवणे नाही .ते अशा प्रकारचा माणूस बनणे आहे, ज्याचे आभार भावी पिढ्या त्याचे नाव न जाणताही मनोमन मानतील.

विजयकुमार कट्टी

# जागतिक पर्यावरण दिन : विकासाच्या नावाखाली निसर्गाचा गळा घोटणारी व्यवस्था

५ जून हा 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून जगभर साजरा केला जातो. पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व जनमानसात रुजविणे, निसर्गाविषयी संवेदनशीलता निर्माण करणे आणि पृथ्वीच्या अस्तित्वासाठी आवश्यक असलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन करण्याचा संदेश देणे हा या दिवसामागील मुख्य उद्देश आहे. मात्र दुर्दैवाने, आज पर्यावरण दिन हा केवळ औपचारिक कार्यक्रम, सोशल मीडियावरील पोस्ट, झाडे लावण्याचे फोटोसेशन आणि भाषणापुरता मर्यादित राहिलेला दिसतो. प्रत्यक्षात मात्र विकासाच्या नावाखाली जंगलांची कत्तल, नद्यांचे प्रदूषण, डोंगरांची तोड, हवेत वाढणारे विषारी घटक आणि शहरांच्या कॉँक्रीटीकरणामुळे पृथ्वीचा श्वासच गुदमरू लागला आहे. आज जग एका अभूतपूर्व पर्यावरणीय संकटाच्या उंबरठ्यावर उभे आहे. ग्लोबल वॉर्मिंग, हवामान बदल, पाण्याची टंचाई, वाढते तापमान, असंतुलित पाऊस, चक्रीवादळे, महापुर, दुष्काळ आणि जैवविविधतेचा ऱ्हास ही केवळ वैज्ञानिक अहवालातील शब्दावली राहिलेली नाही, तर ती आता मानवी जीवनाला थेट ग्रासणारी वस्तुस्थिती बनली आहे. भारतासारख्या विकसनशील देशात तर परिस्थिती अधिक गंभीर आहे. कारण येथे लोकसंख्या वाढ, अनियंत्रित शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि भ्रष्ट व्यवस्थेमुळे पर्यावरणीय समतोल धोक्यात आला आहे.

आज शहरांमध्ये रस्ते रुंदीकरणाच्या नावाखाली हजारो झाडे एका रात्रीत कापली जातात. प्रशासन म्हणते, "विकासासाठी आवश्यक आहे." पण हा विकास नेमका कुणासाठी आणि कोणाच्या किंमतीवर? झाडे तोडून, नद्या बुजवून आणि डोंगर फोडून उभे राहणारे सिमेंटचे जंगल खरंच प्रगतीचे प्रतीक म्हणता येईल काय? विकासाचा अर्थ जर फक्त मॉल, उड्डाणपूल, टॉवर्स आणि कारखाने एवढाच उरला असेल, तर आपण भविष्यातील पिढ्यांसाठी मृत्यूचा वारसा तयार करत आहोत, हे स्पष्ट आहे. भारतातील अनेक शहरांची हवा आज धोकादायक पातळीवर पोहोचली आहे. दिल्ली, मुंबई, पुणे, नागपूर यांसारख्या शहरांमध्ये वाढते वाहनप्रदूषण, औद्योगिक धूर आणि धुळीमुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. श्वसनाचे आजार, हृदयविकार, त्वचारोग आणि कर्करोगासारख्या रोगांमध्ये वाढ होत आहे. दुसरीकडे प्लास्टिक प्रदूषणाने नद्या, समुद्र आणि जमीन अक्षरशः गुदमरली आहे. प्लास्टिक बंदीचे कायदे फक्त कागदावर दिसतात, प्रत्यक्षात बाजारपेठेत सर्वत्र प्लास्टिकचा सुळसुळाट सुरूच आहे.

पर्यावरण संवर्धनाच्या बाबतीत शासनाची भूमिका अनेकदा दुटप्पी दिसते. एका बाजूला वृक्षारोपण मोहिमा राबवल्या जातात, तर दुसऱ्या बाजूला मोठ्या प्रकल्पांसाठी हजारो हेक्टर जंगल जमीन उद्योगपतींना दिली जाते. जंगल हे केवळ लाकूड किंवा जमीन नसून ते पृथ्वीचे फुफ्फुस आहेत, हे शासनाला समजत नाही का? पर्यावरणीय मंजुरी देताना अनेक नियम पायदळी तुडविले जातात. लोकांचा विरोध डावलून प्रकल्प रेटले जातात. पर्यावरण संरक्षणाच्या कायद्यांमध्येही अनेकदा उद्योगस्नेही बदल केले जातात. त्यामुळे प्रश्न निर्माण होतो की, शासन खरोखर पर्यावरण वाचवू इच्छिते की केवळ विकासाच्या नावाखाली नैसर्गिक संपत्तीची विक्री करत आहे? आज नद्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. गंगा, यमुना, गोदावरी, कृष्णा, पंचगंगा, नाग नदी अशा अनेक नद्या औद्योगिक रसायने, सांडपाणी आणि प्लास्टिक कचऱ्यामुळे प्रदूषित झाल्या आहेत. नदी स्वच्छतेच्या नावाखाली हजारो कोटी रुपये खर्च होतात; पण प्रत्यक्षात नद्यांचे प्रदूषण कमी होताना दिसत नाही. कारण भ्रष्टाचार, नियोजनाचा अभाव आणि प्रशासनाची उदासीनता हेच या समस्येचे मूळ आहे.




पर्यावरणाचा प्रश्न हा केवळ झाडांचा किंवा नद्यांचा प्रश्न नाही; तो मानवी अस्तित्वाचा प्रश्न आहे. शेतकरी आज हवामान बदलाचा सर्वात मोठा फटका सहन करत आहे. कधी अतिवृष्टी, कधी अवकाळी पाऊस, कधी दुष्काळ तर कधी गारपीट यामुळे शेतीचे मोठे नुकसान होत आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या, अन्नधान्य उत्पादनातील घट आणि वाढती आर्थिक अस्थिरता यामागे पर्यावरणीय असंतुलन हे एक महत्त्वाचे कारण आहे. पण दुर्दैवाने, पर्यावरणीय प्रश्नांना अजूनही दुय्यम महत्त्व दिले जाते. आजची सर्वात मोठी शोकांतिका म्हणजे पर्यावरण संवर्धनाला 'इव्हेंट' बनवले गेले आहे. जागतिक पर्यावरण दिन आला की सरकारी कार्यालये, शाळा, महाविद्यालये, राजकीय पक्ष आणि विविध संस्था झाडे लावण्याचे कार्यक्रम घेतात. फोटो काढले जातात, सोशल मीडियावर पोस्ट टाकल्या जातात आणि दुसऱ्या दिवशी ती रोपे वाळून जातात. पर्यावरण संवर्धन ही सातत्याने चालणारी जीवनशैली असायला हवी, ती केवळ एका दिवसापुरती मर्यादित राहून चालणार नाही.

पर्यावरण वाचविण्यासाठी केवळ शासनावर टीका करून उपयोग नाही, प्रत्येक नागरिकाने स्वतःची जबाबदारीही ओळखली पाहिजे. पाणी वाचविणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे, सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढविणे, झाडांचे संरक्षण करणे, कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे आणि पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे. कारण पृथ्वी ही केवळ आपली मालमत्ता नाही; ती पुढील पिढ्यांचीही आहे. शाळांमध्ये पर्यावरण शिक्षण अधिक प्रभावी करणे आवश्यक आहे. मुलांना केवळ पुस्तकातील धडे शिकवून उपयोग नाही; तर त्यांना प्रत्यक्ष निसर्गाशी जोडणे गरजेचे आहे. वृक्षसंवर्धन, जलसंधारण, जैवविविधता आणि कचरा व्यवस्थापन याबाबत सामाजिक जाणीव निर्माण करावी लागेल. पर्यावरण संरक्षण हे केवळ सरकारी विभागाचे काम नसून समाजाच्या प्रत्येक घटकाने त्यात सहभाग घेतला पाहिजे.

माध्यमांची भूमिकाही येथे अत्यंत महत्त्वाची आहे. अनेकदा मोठ्या उद्योगसमूहांच्या जाहिरातींच्या दबावामुळे पर्यावरणीय प्रश्नांना पुरेसे स्थान दिले जात नाही. वृक्षतोड, नदीप्रदूषण, खाणकामातील भ्रष्टाचार आणि पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन यावर सातत्याने आवाज उठविणे गरजेचे आहे. कारण स्वतंत्र आणि जबाबदार पत्रकारिताच समाजाला जागृत ठेवू शकते. आज गरज आहे ती पर्यावरणपूरक विकास मॉडेलची. विकास आणि पर्यावरण हे एकमेकांचे शत्रू नाहीत; पण विकासाचा मार्ग निसर्गाशी सुसंवादी असायला हवा. अक्षय ऊर्जा, जलसंधारण, शाश्वत शेती, हरित तंत्रज्ञान आणि सार्वजनिक वाहतूक यांना प्राधान्य दिल्यास विकास आणि पर्यावरण यामध्ये संतुलन साधता येऊ शकते. पण त्यासाठी राजकीय इच्छाशक्ती, पारदर्शक प्रशासन आणि जागरूक नागरिकत्व आवश्यक आहे.

जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने आपण स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे "आपण पुढील पिढ्यांना नेमकी कोणती पृथ्वी देणार आहोत?" हिरवीगार, स्वच्छ आणि जीवनदायी पृथ्वी की प्रदूषणाने ग्रासलेला, पाण्यासाठी संघर्ष करणारा आणि उष्णतेने होरपळणारा ग्रह? हा निर्णय आजच्या पिढीला घ्यावा लागणार आहे. निसर्गाशी युद्ध करून मानव कधीच जिंकू शकत नाही. कारण शेवटी निसर्ग आपला समतोल स्वतः निर्माण करतो, पण त्याची किंमत मानवजातीला चुकवावी लागते. कोरोना महामारीनेही आपल्याला हेच शिकवले की, निसर्गाचा अतिरेकाने ऱ्हास केल्यास त्याचे परिणाम किती भीषण असू शकतात.

पर्यावरण वाचविणे ही आता केवळ सामाजिक जबाबदारी राहिलेली नाही, तर ती अस्तित्वाची लढाई बनली आहे. त्यामुळे पर्यावरण दिन हा केवळ उत्सव न राहता तो आत्मपरीक्षणाचा दिवस व्हायला हवा. झाडे लावण्यापेक्षा झाडे जगविण्याची मानसिकता निर्माण झाली पाहिजे. विकासाच्या नावाखाली निसर्गाचा गळा घोटणाऱ्या धोरणांविरोधात समाजाने जागृतपणे आवाज उठवला पाहिजे. अन्यथा भविष्यातील इतिहास आपल्या पिढीची नोंद "स्वतःच्या विकासाच्या हव्यासापायी पृथ्वी उद्ध्वस्त करणारी पिढी" अशी करेल. आपणास व आपल्या परिवारास जागतिक पर्यावरण दिनाच्या हिरव्यागार शुभेच्छा!

चलाफक्त झाडे लावू नका, ती जगवण्याची जबाबदारीही स्वीकारूया,
पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवूया,
प्लास्टिकमुक्त आणि प्रदूषणमुक्त भारत घडवूया...

निसर्गाचे रक्षण हीच खरी मानवसेवा आहे. भावी पिढ्यांसाठी हिरवीगार, स्वच्छ आणि सुरक्षित पृथ्वी निर्माण करण्याचा संकल्प करूया!"निसर्ग वाचला तरच मानवजातीचे अस्तित्व टिकेल."



प्रवीण बागड़े

# रोज वापरत असलेल्या 'या' सहा वस्तूंमुळे वाढू शकतो कॅन्सरचा धोका

आपण रोज वापरत असलेल्या अनेक वस्तू आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनल्या आहेत. पाण्याच्या बाटल्या, अन्न साठवण्याचे डबे, सुगंधी मेणबत्त्या, नॉन-स्टिक भांडी किंवा ब्युटी प्रोडक्ट्स .या गोष्टी इतक्या सामान्य झाल्या आहेत की त्यांच्याशी संबंधित आरोग्यावर होणाऱ्या धोक्यांकडे आपण अनेकदा दुर्लक्ष करतो.

मात्र तज्ज्ञांच्या मते, काही उत्पादनांमध्ये आढळणारी विशिष्ट रसायने दीर्घकाळ संपर्कात राहिल्यास आरोग्यावर नकारात्मक परिणाम करू शकतात आणि काही प्रकरणांमध्ये कॅन्सरसारख्या गंभीर आजारांचा धोकाही वाढू शकतो.



याचा अर्थ प्रत्येक वस्तू वापरल्याने कॅन्सर होतो असे नाही. मात्र जागरूकता आणि योग्य निवड केल्यास धोके कमी करता येऊ शकतात. जाणून घेऊया अशा काही वस्तूंबद्दल ज्यांचा वापर करताना अधिक काळजी घेणे आवश्यक आहे.

### १. प्लास्टिकचे डबे / बाटल्या

अनेकजण गरम अन्न थेट प्लास्टिकच्या डब्यात ठेवतात किंवा प्लास्टिकच्या बाटलीत गरम पाणी भरतात. काही प्रकारच्या प्लास्टिकमध्ये असलेली रसायने उष्णतेच्या संपर्कात आल्यावर अन्न किंवा पाण्यात मिसळू शकतात.

### २. खरचटलेली नॉन-स्टिक भांडी

नॉन-स्टिक भांड्यांमुळे स्वयंपाक सोपा होतो. मात्र त्यावरील कोटिंग खराब झाल्यास किंवा भांडे अतितापमानाला गरम केल्यास काही हानिकारक घटक बाहेर पडण्याची शक्यता असते.

### ३. सुगंधी मेणबत्त्या / एअर फ्रेशनर्स

घर सुगंधित ठेवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या काही कृत्रिम सुगंधी उत्पादनांमधून हवेत रासायनिक घटक पसरू शकतात. बंद खोलीत यांचा अतिवापर केल्यास श्वसनसंस्थेवर परिणाम होऊ शकतो.

### ४. ब्युटी प्रोडक्ट्स

त्वचा आणि केसांसाठी वापरल्या जाणाऱ्या काही उत्पादनांमध्ये विविध रासायनिक घटक असू शकतात. त्यामुळे उत्पादन खरेदी करताना त्यावरील घटकांची यादी वाचणे महत्त्वाचे आहे.

### ५. प्रोसेस फूड

चिप्स, सॉसेज, प्रोसेस्ड मीट, रेडी-टू-ईट पदार्थ आणि जास्त काळ टिकणारे पॅकेज्ड फूड यामध्ये विविध संरक्षक घटक असू शकतात.

### ६. क्लिनिंग उत्पादने

घर स्वच्छ ठेवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या काही क्लिनर्समध्ये तीव्र रासायनिक घटक असू शकतात. यांचा सतत संपर्क त्वचा आणि श्वसनसंस्थेसाठी त्रासदायक ठरू शकतो.

### आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी टिप्स.

– काच आणि स्टीलच्या भांड्यांचा वापर वाढवा.

– घरात नियमित हवा खेळती ठेवा.

– पॅकेज्ड अन्नाचे प्रमाण कमी करा.

– उत्पादनावरील लेबल वाचण्याची सवय लावा.

– गरम अन्न प्लास्टिकमध्ये ठेवणे टाळा.

प्रत्येक वस्तू धोकादायक असतेच असे नाही, पण तिचा योग्य वापर आणि माहितीपूर्ण निर्णय घेऊनच करणं फायद्याचं ठरेल.

# फ्रिजमध्ये ठेवूनही टोमॅटो सडतात,
## फॉलो करा या स्मार्ट ट्रिक्स



उन्हाळ्यात टोमॅटो फ्रिजमध्ये लवकर खराब होतात. एक ते दोन दिवसांपेक्षा जास्त काळ टोमॅटो टिकत नाहीत. अशा परिस्थितीत उन्हाळ्यात टोमॅटो जास्त काळ टिकवण्यासाठी आणि ते सडण्यापासून वाचवण्यासाठी काही सोप्या आणि प्रभावी स्मार्ट ट्रिक्स पाहूयात,

### टिश्यू पेपर

बाजारातून टोमॅटो आणले की सर्वप्रथम स्वच्छ धुवून कोरडे करावेत. यानंतर एका एअर टाइट कंटेनरमध्ये खाली टिश्यू पेपर ठेवून त्यावर टोमॅटो उलटे ठेवावेत आणि पुन्हा त्यावर टिश्यू पेपर ठेवावा.

### तेलाचा वापर

टोमॅटो धुवून कोरडे झाल्यावर टोमॅटोच्या देठाला थोडं खाण्याचं तेल लावावं. हे तेल लावलेले टोमॅटो एअर टाइट कंटेनरमध्ये ठेवावेत आणि फ्रिजमध्ये स्टोअर करावेत.

### रूम टेंमरेचर

टोमॅटो हिरवे असतील तर फ्रिजमध्ये ठेवू नयेत. असे टोमॅटो रूम टेंमरेचरवर साठवावेत. साठवताना त्याचे उलटे ठेवावेत म्हणजेच टोमॅटोच्या देठाचा भाग खाली ठेवावा.

# कारल्याचा ज्यूस



साहित्य : लहान कारले – १,काकडी – १,पुदिना पाने – ३ ते ४,काळे मीठ –चिमूटभर.

कृती : कारल्याच्या बिया काढून त्याचे तुकडे करून घ्यावेत. कारल्याचा कडवटपणा कमी करण्यासाठी १५ ते २० मिनिटे मीठ लावून ठेवा आणि नंतर स्वच्छ धुवून घ्या.मिक्सरमध्ये कारले, काकडी आणि पुदिना बारीक वाटून घ्यावा.तयार मिश्रण गाळून घ्या आणि त्यात चवीनुसार मीठ टाकून सर्व्ह करा.



# प्रसिध्द निर्माता पहलाज निहलानी यांचे निधन

सेन्सॉर बोर्डाचे माजी अध्यक्ष आणि प्रसिध्द निर्माता पहलाज निहलानी यांचे गुरुवारी निधन झाले. ते ७६ वर्षांचे होते. गेले काही दिवस प्रकृती अस्वस्थ्यामुळे त्यांना नानावटी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारानंतर त्यांना घरी आणण्यात आले होते, मात्र गुरूवारी सकाळी ९.३० वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पार्थिवावर गुरूवारी दुपारी ३.३० च्या सुमारास सांताक्रुझ येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याची माहिती त्यांच्या कुटुंबियांनी एका निवेदनाद्वारे दिली.

ऐंशी आणि नव्वदच्या दशकातील 'आँखे', 'शोला और शबनम', 'अंदाज' अशा काही लोकप्रिय चित्रपटांचे निर्माते म्हणून त्यांची ओळख होती. मात्र, २०१५ मध्ये 'सेन्सॉर बोर्डा'चे अध्यक्ष म्हणून सूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांची कारकीर्द अधिक वादग्रस्त ठरली.पहलाज निहलानी यांनी १९८२ मध्ये 'हथकडी' या चित्रपटाची निर्मिती केली होती. त्यानंतर त्यांनी लागोपाठ 'आँधी-तूफान', 'इल्जाम' अशा चित्रपटांची निर्मिती केली. धर्मेंद्र, शत्रुघ्न सिन्हा, शशी कपूर, सनी देओल यांना घेऊन त्यांनी बहुकलाकार असलेल्या चित्रपटांची निर्मिती केली होती. हिंदी चित्रपटसृष्टीतील काही नावाजलेल्या



निर्मात्यांपैकी निहलानी एक होते. अभिनेता गोविंदा आणि चंकी पाडे यांना आपल्या चित्रपटातून पदार्पणाची संधीही निहलानी यांनी दिली होती.

या दोघांना घेऊन केलेला 'आँखे' आणि गोविंदा-दिव्या भारती जोडीचा 'शोला और शबनम' हे त्यांचे दोन्ही चित्रपट त्याकाळी यशस्वी ठरले होते. २०१२ मध्ये पुन्हा एकदा गोविंदाला मुख्य भूमिकेत घेऊन केलेल्या 'अवतार' या चित्रपटाचे दिग्दर्शनही निहलानी यांनी केले होते.

जवळपास तीन दशके त्यांनी 'असोसिएशन ऑफ पिक्चर्स अँड टीव्ही प्रोग्रॅम प्रोड्युसर्स' या संस्थेचे अध्यक्ष म्हणून धुरा सांभाळली होती. २०१४ मध्ये देशात सत्तापालट झाल्यानंतर निहलानी यांची सेन्सॉर बोर्डाचे अध्यक्ष म्हणून केलेली नियुक्ती वादळी ठरली. या अध्यक्षपदामुळे खऱ्या अर्थाने निहलानी चर्चेत आले.

सेन्सॉर बोर्डाचे अध्यक्ष म्हणून २०१५ मध्ये सूत्रे हाती घेतल्यानंतर निहलानी यांनी निर्मात्यांना सळो की पळो करून सोडले होते. काही शिव्या, स्त्रियांवरच्या हिंसाचाराची दृश्ये, धार्मिक भावना दुखावल्या जातील असा आशय वा दृश्ये यांना चित्रपटात स्थान मिळणार नाही, असे जाहीर करत त्यांनी अनेक चित्रपटांना सेन्सॉरची कात्री लावली. अनुराग कश्यपची निर्मिती असलेल्या 'उडता पंजाब' चित्रपटाला त्यांनी ८९ कट्स सुचवले होते. त्याशिवाय, चित्रपटाला सेन्सॉर बोर्डाचे प्रमाणपत्र मिळणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले होते. अखेर या निर्णयाविरोधात अनुराग कश्यप यांनी न्यायालयीन लढाईचा मार्ग निवडला.

न्यायालयाकडून दिलासा मिळाल्यानंतर फक्त एका दृश्याला कात्री लावत 'उडता पंजाब' चित्रपट प्रदर्शित झाला. सेन्सॉर बोर्डाचे अध्यक्ष म्हणून निहलानी यांनी केलेल्या मनमानीचा फटका 'लिपस्टिक अंडर माय बुरखा' या चित्रपटालाही बसला होता. जेम्स बाँड श्रुंखलेतील 'स्पेक्टर' या चित्रपटातील चुंबनदृश्यालाही त्यांनी कात्री लावली होती. त्यांच्या या कार्यपध्दतीबद्दल हिंदी चित्रपटसृष्टीतील अनेक नावाजलेल्या निर्माता-दिग्दर्शकांनी त्यांच्यावर टीका केली होती. अखेर २०१७ मध्ये त्यांना सेन्सॉर बोर्डाच्या अध्यक्षपदावरून पायउतार व्हावे लागले. त्यांनी २०१५ मध्ये एफटीआयआयचे अध्यक्ष म्हणून गजेंद्र चौहान यांच्या नियुक्तीविरोधात विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनाबाबत त्यांना देशद्रोही म्हणत त्यांच्यावर टीका केली होती.

# आमिर खान गर्लफ्रेंड गौरी स्प्रॅटशी करणार विवाह

हिंदी चित्रपटसृष्टीचा अभिनेता 'मिस्टर परफेक्शनिस्ट', आमिर खान अखेर त्याच्या प्रेयसीशी लग्न करणार असल्याची पुष्टी झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर अशा अफवा पसरत होत्या की, अभिनेता लवकरच त्याची गर्लफ्रेंड गौरी स्प्रॅटशी लग्न करणार आहे. दरम्यान अभिनेत्यानं लग्नाची पुष्टी करत या अफवांना पूर्णविराम दिला आहे. एका मीडिया संवादात आमिर खाननं विशेष माहिती देताना सांगितलं की, तो आणि त्याची पार्टनर गौरी स्प्रॅटशी ५ जुलै २०२६ रोजी लग्न करणार आहेत. "मी सध्या अमेरिकामध्ये फिरत आहे. लग्नाची बातमी खरी आहे. ते ५ जुलै रोजी होणार आहे. माझ्या नात्यात लग्न ही मोठी गोष्ट नाही. हो, हे खरं आहे. पण आता आम्हा दोघांनाही वाटतं की, आम्ही आमचं नातं पुढच्या टप्प्यावर नेण्यासाठी तयार आहोत."



आमिर खाननं त्याच्या ६०व्या वाढदिवसाच्या दिवशी आपल्या जोडीदाराची खास पद्धतीनं ओळख करून दिली. त्यानं स्पष्ट केलं की, जरी त्यांच्यात जवळपास २५ वर्षांपासून मैत्री असले तरी, त्यांच्या मनात एकमेकांविषयी प्रेमाची भावना नुकतीच निर्माण झाली आहे. मार्च २०२५मध्ये आपल्या वाढदिवसानिमित्त माध्यमांशी संवाद साधताना, आमिरनं खुलासा केला की, तो गौरीला सुमारे २५ वर्षांपूर्वी पहिल्यांदा भेटला होता. नंतर, त्याची चुलत बहीण नुजहत खानच्या माध्यमातून ते दोघे पुन्हा संपर्कात आले. हळूहळू त्यांच्यात एक घट्ट नाते निर्माण झाले.

आपल्या नात्याबद्दल बोलताना आमिर म्हटलं, "मी भाग्यवान आहे की, मी एका घट्ट नात्यात आहे. जसं की, मी आणि रीनानं १६ वर्षे एकत्र घालवली, आणि मग मी आणि किरणनं १६ वर्षे एकत्र घालवली, आणि अनेक अर्थांनी आम्ही आजही एकत्र आहोत. मी खूप काही शिकलो आहे. गौरीबरोबर मला स्थिर आणि सुरक्षित वाटते." आपल्या नात्याची पुष्टी केल्यानंतर लगेचच, आमिर खानला विचारण्यात आलं की लवकरच लग्नाची तयारी सुरू होणार आहे का? यावर अभिनेता म्हणाला, "बघा, मी आणि गौरी एकमेकांबद्दल खूप गंभीर आहोत, आणि आमचं नातं खूप घट्ट आहे. तुम्हाला माहीत आहेच की, आम्ही साथीदार आहोत. आम्ही एकत्र आहोत." आमिर खानच्या पूर्वीच्या नात्यांबद्दल सांगायचं झालं तर, त्याचं पहिलं लग्न रीना दत्ताबरोबर झालं होतं. या दोघांना दोन मुले आहेत, मुलगा जुनैद आणि मुलगी आयरा खान. मात्र, २००२ मध्ये त्यांनी वेगळे होण्याचा निर्णय घेतला. २००५ मध्ये, आमिरनं किरण रावबरोबर दुसऱ्यांदा लग्न केलं. किरण आणि आमिर यांना आझाद राव खान नावाचा एक मुलगा आहे. आमिर आणि किरण यांचं नात २०२१ मध्ये समाप्त झालं.

# जान्हवी कपूरनं 'पेड्डी' चित्रपटासाठी केली प्रार्थना



अभिनेता राम चरण आणि जान्हवी कपूर यांच्या प्रमुख भूमिका असलेला तेलुगू चित्रपट 'पेड्डी' ४ जून रोजी म्हणजेच गुरुवारी मोठ्या पडद्यावर प्रदर्शित झाला आहे. आता या चित्रपटाबद्दल सोशल मीडियावर खूप चर्चा होताना दिसत आहे. चित्रपटाच्या रिलीजपूर्वी अभिनेत्री जान्हवी कपूरनं आंध्र प्रदेशातील 'श्रीवारी मंदिरा'त जाऊन दर्शन घेतल्याची बातमी समोर आली आहे. फुलांचे नक्षीकाम असलेली, जांभळ्या रंगाची चमकदार रेशमी साडी परिधान करून अभिनेत्री आपल्या गाडीपासून मंदिरापर्यंत अनवाणी चालत गेली. यावेळी तिनं सोन्याचा कमरपट्टा, चोकर हार, झुमके आणि सोन्याच्या बांगड्या देखील परिधान केल्या होत्या.

तिचा हा लूक खूप विशेष होता .जान्हवी मंदिरातून बाहेर पडत असताना ती मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ थांबली. तिनं मंदिरासमोर नतमस्तक होऊन आदरानं आपले कपाळ जमिनीला टेकवलं. आता जान्हवीचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर खूप व्हायरल झाला आहे. याला अनेकजण पसंत करत आहेत. 'पेड्डी' या चित्रपटाबद्दल सांगायचं झाल्यास,

याचं दिग्दर्शन बुची बाबू सना यांनी केलंय. या चित्रपटात राम चरण आणि जान्हवी कपूर यांच्या व्यतिरिक्त बोमन इराणी, शिवा राजकुमार, जगपती बाबू ,दिव्येंदू आणि असे अनेक कलाकार आहेत. या चित्रपटात राम चरणनं एका 'क्रॉसओव्हर ॲथलीट'ची भूमिका साकारली आहे, जो क्रिकेट, कुस्ती आणि धावण्याच्या शर्यती या तिन्ही क्षेत्रांत पारंगत असतो.

# कमळीच्या यशाने भारावली विजया बाबर; म्हणाली माझे कॉलेजचे दिवस आठवले...

झी मराठीवरील 'कमळी' मालिका सुरुवातीपासूनच प्रेरणादायी कथानकामुळे प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली आहे. शिक्षण, आत्मविश्वास आणि स्वत:च्या पायावर उभं राहण्याचं महत्त्व या मालिकेने सातत्याने मांडलं आहे. कमळीची कहाणी अनेक मुलींना मोठी स्वप्न पाहण्याची आणि ती पूर्ण करण्यासाठी मेहनत घेण्याची प्रेरणा देत आहे. सध्या मालिकेत कमळीच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा टप्पा दाखवला जात आहे. उच्च शिक्षणासाठी गाव सोडून नवीन शहरात आलेल्या कमळीने तिच्या स्वप्नाच्या दिशेने पहिले मोठे पाऊल यशस्वीपणे टाकले आहे. पदवी शिक्षणाच्या पहिल्या वर्षात तिने तब्बल ९६% गुण मिळवत यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे तिचा निकाल स्वत: शिक्षणमंत्र्यांच्या हस्ते जाहीर केला जातो, ज्यामुळे हा क्षण आणखी खास ठरतो.

या ट्रॅकविषयी बोलताना कमळीची भूमिका साकारणारी अभिनेत्री विजया बाबर म्हणाली, "कमळीसाठी हा खूप मोठा आणि भावनिक क्षण आहे. मालिकेच्या पहिल्या दिवसापासून प्रेक्षकांनी तिचा संघर्ष पाहिला आहे. घर सोडून शिक्षणासाठी नवीन शहरात येणं, अनेक अडचणींवर मात करणं आणि स्वत:ची ओळख निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणं, हा तिचा प्रवास प्रेरणादायी आहे. त्यामुळे ९६% गुण मिळवण्याचा हा क्षण फक्त कमळीचाच नाही, तर तिच्यासोबत हा प्रवास अनुभवणाऱ्या प्रत्येक प्रेक्षकाचाही आहे. कमळीच्या मोठ्या स्वप्नाची ही फक्त सुरुवात आहे. तिच्या कथेतून




अनेक तरुण मुलींना त्यांच्या स्वप्नांचा पाठपुरावा करण्याची प्रेरणा मिळेल, अशी मला आशा आहे."या प्रसंगाच्या चित्रीकरणाने विजयालाही तिच्या कॉलेजच्या दिवसांची आठवण करून दिली. त्याबद्दल ती म्हणाली, "हा सीन करताना मला माझे कॉलेजचे दिवस आठवले. आमच्या वेळी टक्केवारीऐवजी सीजीपीए पद्धत होती. मी बॅचलर ऑफ मास मीडिया (BMM) केले असून मला १० पैकी ८ -८.५ सीजीपीए मिळाले होते. तसेच दहावी आणि बारावीमध्येही मला ८० ते ८१ टक्के गुण मिळाले होते. त्यावेळी असे काही मोठ सेलिब्रेशन झाल नव्हत, पण माझ्या आयुष्यात काही चांगलं घडलं की मी सिद्धिविनायकाचं दर्शन घ्यायला जाते. त्यामुळे हा सीन करताना त्या सगळ्या आठवणी पुन्हा ताज्या झाल्या."

कमळीच्या आयुष्यातील हा महत्त्वाचा टप्पा तिच्या पुढील प्रवासाची नवी सुरुवात ठरणार आहे. तिची जिद्द, मेहनत आणि शिक्षणावरील विश्वास प्रेक्षकांना पुढेही प्रेरणा देत राहणार आहे.

# वर्किंग महिलांमध्ये युरिन इन्फेक्शनचा धोका का वाढतोय? डॉक्टरांनी सांगितली धक्कादायक कारणे

भारतामधील शहरी भागात राहणाऱ्या तरुण आणिवर्किंग महिलांमध्ये युरिनरी ट्रॅक्ट इन्फेक्शन (UTI) तसेच व्हॅजायनल इन्फेक्शनच्या घटनांमध्ये चिंताजनक वाढ होत आहे. पूर्वी अधूनमधून होणारी ही समस्या आता अनेक महिलांसाठी वारंवार उद्भवणारा त्रास ठरत आहे. काही महिलांना वर्षातून तीन ते चार वेळा या वेदनादायक संसर्गाचा सामना करावा लागत आहे. डॉक्टरांच्या मते, जगातील सर्वाधिक यूटीआयचा भार भारतात असून, विशेषत: सुशिक्षित आणि आरोग्याबाबत जागरूक महिलांमध्येही हा धोका वाढताना दिसत आहे.

## ऑफिसचे दीर्घ कामाचे तास आणि अस्वच्छ स्वच्छतागृहे

शहरी जीवनशैलीमुळे अनेक महिलांना दीर्घकाळ ऑफिसमध्ये बसून काम करावे लागते. अनेक ठिकाणी स्वच्छ आणि सुरक्षित स्वच्छतागृहांची कमतरता असल्याने महिला बराच वेळ लघवी रोखून ठेवतात. डॉक्टरांच्या मते, लघवी दीर्घकाळ रोखून ठेवल्याने मूत्राशयामध्ये जीवाणूंची वाढ जलद गतीने होते. परिणामी युरिन इन्फेक्शन होण्याचा धोका वाढतो.

याशिवाय, इंटिमेट हायजीनबाबतच्या काही चुकीच्या सवयीही संसर्गाला कारणीभूत ठरतात. चुकीच्या पद्धतीने स्वच्छता करणे किंवा सुगंधी आणि रसायनयुक्त उत्पादनांचा वापर केल्याने योनीतील नैसर्गिक चांगले जीवाणू नष्ट होतात. त्यामुळे संसर्गाविरोधातील नैसर्गिक संरक्षण कमकुवत होते.



## स्वत:हून अँटिबायोटिक्स घेणे ठरते धोकादायक

लघवी करताना जळजळ किंवा वेदना जाणवल्यास अनेक महिला डॉक्टरांचा सल्ला न घेता थेट मेडिकल स्टोअरमधून अँटिबायोटिक्स खरेदी करतात. काही प्रमाणात आराम मिळाल्यानंतर औषधांचा कोर्स अर्धवट सोडून देण्याची सवयही मोठ्या प्रमाणात दिसून येते.

तज्ज्ञांच्या मते, ही अतिशय धोकादायक सवय आहे. औषधांचा कोर्स पूर्ण न केल्यास शरीरातील सर्व जीवाणू नष्ट होत नाहीत. त्यामुळे कालांतराने अँटिबायोटिक रेझिस्टन्स निर्माण होतो. याचा अर्थ पुढील वेळी तीच औषधे प्रभावी ठरत नाहीत आणि संसर्ग पुन्हा पुन्हा होण्याची शक्यता वाढते.


## घट्ट कपडे आणि वाढता मानसिक ताण

आधुनिक फॅशन ट्रेंडदेखील या समस्येला अप्रत्यक्षपणे कारणीभूत ठरत आहेत. सतत टाइट सिंथेटिक कपडे किंवा घट्ट जीन्स परिधान केल्याने इंटिमेट भागात हवेचा प्रवाह कमी होतो. त्यामुळे त्या भागात ओलावा वाढतो.

हा ओलसरपणा जीवाणू आणि बुरशीच्या वाढीसाठी पोषक वातावरण तयार करतो. परिणामी युरिन आणि व्हॅजायनल इन्फेक्शनचा धोका वाढतो. याशिवाय, ऑफिस आणि घरातील जबाबदाऱ्यांचा ताण सांभाळताना अनेक महिलांमध्ये दीर्घकालीन मानसिक तणावाचे प्रमाण वाढत आहे. सततच्या तणावामुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होते. रोगप्रतिकारक शक्ती कमी झाल्यास शरीराला संसर्गाविरुद्ध प्रभावीपणे लढणे कठीण जाते.

## यूटीआयपासून बचावासाठी काय करावे?

तज्ज्ञांच्या मते, काही साध्या सवयी अंगीकारल्यास यूटीआयचा धोका मोठ्या प्रमाणात कमी करता येऊ शकतो.लघवी दीर्घकाळ रोखून ठेवणे टाळावे.दिवसभर पुरेसे पाणी प्यावे.स्वच्छ आणि योग्य इंटिमेट हायजीन राखावी. रसायनयुक्त किंवा सुगंधी उत्पादनांचा वापर मर्यादित ठेवावा.सैल आणि कॉटनचे कपडे वापरण्याला प्राधान्य द्यावे. कोणतेही अँटिबायोटिक औषध डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय घेऊ नये.नियमित व्यायाम, पुरेशी झोप आणि तणाव नियंत्रणावर भर द्यावा.महिलांनी यूटीआयची लक्षणे दिसताच दुर्लक्ष न करता तातडीने वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक आहे. योग्य वेळी उपचार घेतल्यास वारंवार होणाऱ्या संसर्गापासून बचाव करता येऊ शकतो आणि भविष्यातील गंभीर गुंतागुंतही टाळता येते.




- ■ मेष : कायद्याच्या कक्षेत राहून आपणास काम मिळेल. पाहुण्यांचे स्वागत करावे लागेल.
- ■ वृषभ: विचारपूर्वक निर्णय घेता येईल. मोठ्या लोकांच्या ओळखीमुळे अडलेले काम पूर्ण करता येईल.
- ■ मिथुन: मोठे व्यावसायिक धाडस करू शकाल.
- ■ कर्क: तुमच्या ओळखीचा फायदा होईल. प्रतिष्ठा वाढेल. आर्थिक समृद्धी आणि खर्चात वाढ होईल.
- ■ सिंह: ठरवलेले काम पूर्ण करता येईल. कार्यक्षेत्रात अनेक संधी येतील. मर्यादेत काम करावे लागेल.
- ■ कन्या : कल्पनाशक्तीला संधी मिळेल. मान-सन्मान मिळेल. नवीन कामात यश मिळेल. कुटुंबात काही सदस्यांची उणीव भासेल.
- ■ तूळ: तुमच्या कामात एखादी चूक होऊ शकते. डोके शांत ठेवा.
- ■ वृश्चिक: नोकरीत प्रगतीची संधी सावधपणे घ्या. कामात समाधानी राहाल. मित्रांचे सहकार्य मिळेल.
- ■ धनु : शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या निरोगी राहाल.
- ■ मकर : व्यावहारिकतेकडे अधिक लक्ष द्या.
- ■ कुंभ: कामात व्यस्त असाल. सौम्य शब्दांत मत मांडा. सामाजिक कार्यात सहभागी व्हावे लागेल.
- ■ मीन – आजचे काम उद्यावर टाकू नका. स्पर्धेमध्ये टिकून राहू शकाल. भावंडांशी मिळतेजुळते घ्यावे. कल्पकतेला वाव मिळेल.

# फुगेवाडी विषारी दारू प्रकरणानंतर मोठी कारवाई

## मुख्य आरोपीच्या अनधिकृत घरावर महापालिकेचा हातोडा

पुणे (अभिजीत येरल्लू) : शहरातील फुगेवाडी परिसरात विषारी दारू विक्री प्रकरणात नाव समोर आलेल्या कर्नलसिंग विरखा याच्या घरावर प्रशासनाने मोठी कारवाई सुरू केली आहे. ज्या घरातून तो दारूची विक्री करत होता, ते अनधिकृत बांधकाम गुरुवारी महापालिकेकडून पाडण्यात येत आहे. मजूर आणि ब्रेकरच्या मदतीने ही कारवाई सुरू असून, परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला.

**कठोर कारवाईचा इशारा –** या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली असून, नागरिकांनीही या निर्णयाचे स्वागत केले आहे. विषारी दारू प्रकरणानंतर प्रशासन अधिक सतर्क झाले असून, अशा बेकायदेशीर धंद्यांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

**आरोपीचे घर अनधिकृत –** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे उपायुक्त अण्णा बोदडे यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, कर्नलसिंग विरखा हा गेल्या सुमारे ४५ वर्षांपासून फुगेवाडी परिसरात अनधिकृतपणे राहत होता. विशेष म्हणजे, गेल्या ४० वर्षांपासून तो या ठिकाणी बेकायदेशीर दारू विक्री करत होता. मात्र, इतक्या वर्षांत त्याने महापालिकेचा कोणताही कर भरलेला नव्हता. त्यामुळे त्याचे संपूर्ण वास्तव्य हे नियमबाह्य आणि अनधिकृत असल्याचे स्पष्ट झाले.




यावेळी पिंपरी चिंचवड महानगरपालिका उपायुक्त अण्णा बोदडे म्हणाले, "महापालिकेने या प्रकरणाची सखोल माहिती घेतली. संबंधित जागेची कागदपत्रे, बांधकामाची स्थिती आणि कायदेशीर बाबींची तपासणी करण्यात आली. या सर्व तपासणीनंतर हे बांधकाम पूर्णतः अनधिकृत असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर नियमांनुसार नोटीस प्रक्रिया पूर्ण करून आज प्रत्यक्ष पाडकामाची कारवाई करण्यात येत आहे."



**पोलीस बंदोबस्त तैनात –** ही कारवाई करताना कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासन आणि महापालिका प्रशासन यांच्या संयुक्त बंदोबस्तात पाडकाम सुरू आहे. परिसरात तणाव निर्माण होऊ नये यासाठी अतिरिक्त पोलीस तैनात करण्यात आले आहेत.

**अनधिकृत बांधकामांवर यापुढेही कठोर कारवाई –** दरम्यान, फुगेवाडीतील विषारी दारू प्रकरणामुळे अनेकांचे जीव धोक्यात आले होते. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने केलेली ही कारवाई महत्त्वाची मानली जात आहे. बेकायदेशीर धंदे करणाऱ्यांवर आणि अनधिकृत बांधकामांवर यापुढेही कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशाराही महापालिकेने दिला आहे.


**प्रशासनाच्या भूमिकेचे समर्थन –** स्थानिक नागरिकांनीही प्रशासनाच्या या भूमिकेचे समर्थन केले असून, परिसरातील गुन्हेगारी आणि बेकायदेशीर व्यवसाय थांबवण्यासाठी अशा कारवाया आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले आहे.



# WFI Plea Against HC Order Allowing Wrestler Vinesh Phogat For Selection Trials Infructuous: SC

New Delhi : The Supreme Court on Thursday said the plea of the Wrestling Federation of India against the Delhi High Court order allowing wrestler Vinesh Phogat to participate in selection trials has become infructuous in view of subsequent developments.

A bench of Justices PS Narasimha and Aravind Kumar, which refused to go into the observations made by the high court, said this court should not be taken as having reiterated the findings and observations made in the order. The bench said all the issues are left open.



Senior advocate DN Goburdhun, appearing for the WFI, said that Phogat was allowed to participate in the selection trial, but she did not succeed. "She did not succeed, but she created havoc over there," the senior counsel told the bench.

The bench told him that the issue has now become infructuous. Goburdhun submitted that there were certain observations made by the high court with regard to decisions of the Federation and termed them "malafide" and "deplorable".

"All these observations will have to go as the matter is pending before the single bench," the senior counsel submitted. The top court then left the questions open and disposed of the plea as infructuous.

On May 29, the top court permitted Phogat to participate in the selection trials to be held on May 30 and 31 for the Asian Games 2026. The Wrestling Federation of India (WFI) had challenged the Delhi High Court order of May 22 allowing Phogat to participate in the selection trials.

# Tamil Nadu Interested In Hosting The National Games 2029; Minister Aadhav Arjuna Submits A Memorandum To Union Minister

Chennai : TN Minister for Public Works, Highways & Sports Development Aadhav Arjuna called on Union Minister for Youth Affairs & Sports Mansukh Mandaviya in New Delhi today and submitted a memorandum outlining TN's interest in hosting the National Games 2029.

Under the visionary leadership of Hon'ble Chief Minister of Tamil Nadu, Thiru. C. Joseph Vijay, the Government of Tamil Nadu recognises sports as a powerful tool for social change. The primary objective of the government is to channel the energy of the youth in a constructive manner, promote a healthy lifestyle, and create a positive impact on society. In its journey toward the noble goal of a 'Drug-Free Tamil Nadu', the Government of Tamil Nadu is committed to fostering a clean, honest, and value-based sports culture.

Youth Welfare and Sports Development Department is actively working to empower the younger generation through sports and shape them into the achievers of tomorrow. Hon'ble Chief Minister's stated vision is that Tamil Nadu will extend its full support and contribution toward the ambition of India emerging as a global sports superpower by achieving continuous victories in major international arenas, including the Olympic, Paralympic, and Asian Games.

Accordingly, on the directions of the Hon'ble Chief Minister of Tamil Nadu, Hon'ble Minister for Public Works, Highways and Sports Development, Thiru. Aadhav Arjuna called on the Hon'ble Union Minister for Youth Affairs & Sports, Dr. Mansukh Mandaviya, in New Delhi today (03.06.2026) and submitted a Memorandum outlining Tamil Nadu's interest to host the National Games 2029 and sought the Government of India's support for comprehensive



sports development across Tamil Nadu.

During the meeting, several landmark proposals were presented to position Tamil Nadu as India's premier sporting destination. Highlighting the State's proven track record in successfully hosting major national and international events, the State presented a compelling vision for hosting the 2029 National Games, which would create a lasting infrastructure legacy and boost the State's sporting ecosystem.

National Centre of Excellence (NCoE) for Combat Sports is proposed to be housed within the upcoming 48-acre Trichy Olympic Academy, serving as a centralised hub for combat disciplines. Furthermore, leveraging Tamil Nadu's extensive 1,076 km coastline, Nagapattinam district was put forward as the ideal location for a National Centre of Excellence for Beach Sports due to its unique coastal landscape and availability of local talent.

Recognising Tamil Nadu's strong base in cycling, the discussions emphasised establishing an international-standard, UCI-compliant Indoor Cycling Velodrome and a National Cycling High-Performance Centre in Coimbatore to tap into Tamil Nadu's vibrant cycling ecosystem. To decentralise development of athletics, the State proposed laying international-standard 400m synthetic tracks in the districts of Pudukkottai, Thoothukudi, Villupuram, Tiruvallur, and Krishnagiri.

Building on the State's rich tradition of producing national and international swimmers, regional world-class Olympic-Standard Aquatic Complexes were proposed for Coimbatore, Chengalpattu, Tiruvarur, and Tiruppur districts. Additionally, to accommodate growing youth participation in indoor disciplines, international-standard multi-purpose indoor stadiums were proposed for Kallakurichi, Tirunelveli, Ranipet, and Cuddalore districts.

The meeting also addressed emerging and specialised sporting disciplines, showcasing a plan to set up an International Sport Climbing Centre in Chennai, capitalising on the city's accessibility and established sports network to target future Olympic medal potential. To further widen the talent pipeline, the State requested an expansion of the Khelo India ecosystem, aiming to set up additional Khelo India Centres and District Centres across Tamil Nadu, ensuring at least two priority sports disciplines are covered in every single district.

A National Anti-Doping Education and Awareness Centre is proposed in Chennai to function as a national hub for research and capacity building in collaboration with the National Anti-Doping Agency. A National Sports Science, Sports Medicine, Recovery and Rehabilitation Centre is proposed in Madurai, utilising the existing sports science framework to offer integrated performance optimization and injury recovery services for athletes across India.

The Hon'ble Union Minister for Youth Affairs and Sports, Dr Mansukh Mandaviya, appreciated the efforts of the Government of Tamil Nadu in promoting sports and assured to extend his full support and cooperation.

Secretary to Government, Youth Welfare and Sports Development Department, Thiru. Sajjansingh R. Chavan, I.A.S., and Member Secretary, Sports Development Authority of Tamil Nadu, Thiru. J. Meghanatha Reddy, I.A.S., were also present in this meeting, which is mentioned in TN Govt Press Release.

# सर्पदंशावरील संशोधनासाठी भारत-घाना सहकार्याची नवी दिशा

## हाफकिन संस्था आणि घानाच्या सीपीएमआर संस्थेमध्ये धोरणात्मक सहकार्याबाबत चर्चा

● मुंबई, विशाल कारंडे :

सर्पदंशावरील प्रभावी उपचारपद्धती विकसित करण्यासह जागतिक आरोग्य संशोधनाला चालना देण्यासाठी मुंबईतील हाफकिन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्था (एचआयटीआरआय) आणि घाना सरकारच्या सेंटर फॉर प्लांट मेडिसिन रिसर्च (सीपीएमआर) यांच्यात धोरणात्मक सहकार्याची दिशा निश्चित करण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली. परळ येथील हाफकिन संस्थेच्या मुख्यालयात झालेल्या या बैठकीत दोन्ही संस्थांनी वैज्ञानिक संशोधन, पारंपरिक औषधांचे वैज्ञानिक प्रमाणीकरण आणि सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील सहकार्याच्या विविध संधींचा आढावा घेण्यात आला.

हाफकिन संस्थेचे संचालक डॉ. सुवर्णा खरात तसेच संस्थेतील अजित जगताप, मृणाल घाग सावंत यांच्या समवेत झालेल्या बैठकीत घानाच्या उच्चस्तरीय शिष्टमंडळाने सहभाग घेतला. या शिष्टमंडळात सीपीएमआरचे अध्यक्ष हेन्री रॉकफेलर निम्बाबोउरा, कार्यकारी संचालक प्रा. ॲलेक्स असासे, उपकार्यकारी संचालक डॉ. जोनास कोफी डॉनकोर, फॉर्माकॉलॉजी व टॉक्सिकॉलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. स्टीफन अँटवी तसेच नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ व्हॅक्सिनचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. फैसल नहू आणि तांत्रिक सल्लागार डेव्हिड बोआमा अचेम्पॉंग यांचा समावेश होता.



बैठकीत विशेषत: सर्पदंशामुळे होणाऱ्या विषबाधेच्या वाढत्या समस्येवर सखोल चर्चा करण्यात आली. आशिया आणि आफ्रिकेतील ग्रामीण व वंचित भागांमध्ये सर्पदंश हा गंभीर सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न बनला असून त्यावरील स्वस्त, प्रभावी आणि सहज उपलब्ध उपचारांची गरज अधोरेखित करण्यात आली. दोन्ही संस्थांनी वनस्पतीजन्य औषधांच्या आधारे सर्पदंश व्यवस्थापनासाठी नवीन उपचारपद्धती विकसित करणे, झेब्राफिश आधारित प्रीक्लिनिकल मॉडेल्स तयार करणे, संयुक्त संशोधन प्रकल्प राबविणे, आंतरराष्ट्रीय संशोधन अनुदानांसाठी प्रस्ताव सादर करणे आणि वैज्ञानिक क्षमतावृद्धीसाठी एकत्रित प्रयत्न करण्याबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली.

यावेळी बोलताना डॉ. सुवर्णा खरात यांनी सांगितले की, जागतिक आरोग्यविषयक आव्हानांचा सामना करण्यासाठी आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक भागीदारीमुळे नवोन्मेषी संशोधनाला चालना मिळेल, वैज्ञानिक क्षमता अधिक बळकट होईल आणि जगभरातील लोकांसाठी उपयुक्त ठरणारे आरोग्यविषयक उपाय विकसित करण्यास मदत होईल.

प्रस्तावित सहकार्याअंतर्गत संशोधक आणि विद्यार्थ्यांची देवाणघेवाण, विशेष प्रशिक्षण कार्यक्रम, संयुक्त अभ्यास, तंत्रज्ञान हस्तांतरण यासंदर्भात संयुक्त प्रस्ताव तयार करण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. यामुळे युवा वैज्ञानिकांना जागतिक दर्जाच्या संशोधन पद्धती आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा परिचय होण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

ही बैठक भविष्यातील औपचारिक सहकार्याचा पाया रचणारी ठरली असून भारत आणि घाना या दोन्ही देशांमधील वैज्ञानिक संबंध अधिक दृढ करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल ठरले आहे. सार्वजनिक आरोग्य, जैवविविधतेवर आधारित औषध संशोधन, विषशास्त्र आणि ट्रान्सलेशनल सायन्स या समान प्राधान्यक्रमांद्वारे दोन्ही संस्था नाविन्यपूर्ण उपचारपद्धतींचा शोध, संशोधन परिसंस्थेचे बळकटीकरण आणि उष्णकटिबंधीय प्रदेशांतील आरोग्य परिणाम सुधारण्यासाठी संयुक्तपणे कार्य करणार आहे.

हाफकिन संस्था आणि सीपीएमआर यांच्यातील हे सहकार्य भारत-आफ्रिका वैज्ञानिक भागीदारीचे आशादायी उदाहरण ठरणार असून जागतिक आरोग्य संशोधन क्षेत्रात नवे मानदंड निर्माण करण्यास मदत होणार आहे.

# साखर कारखान्याला आता १०० टक्के ‘बैल-मुक्त’ प्रमाणपत्र

## आता बैलांऐवजी ट्रॅक्टरने होणार उसाची वाहतूक

● सोलापूर, विशाल पाटील :

महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यातील एका साखर कारखान्याने आपल्या दैनंदिन कामकाजात बैलांचा वापर पूर्णपणे बंद केला आहे. या निर्णयाची दखल घेत प्राण्यांच्या हक्कांसाठी काम करणाऱ्या एका प्रमुख संस्थेने या कारखान्याला ‘१०० टक्के बैल-मुक्त प्रमाणपत्र’ प्रदान केले आहे. उसाने भरलेल्या गाड्या ओढण्यासारख्या कष्टाच्या कामांसाठी बैलांचा वापर पूर्णपणे थांबवणाऱ्या साखर कारखान्यांनाच हे प्रमाणपत्र दिले जाते. सोलापूर जिल्ह्यातील अचेगाव येथे स्थित असलेल्या ‘जय हिंद शुगर प्रा. लि.’ या कारखान्याला, ‘पेटा इंडिया’ या संस्थेकडून हे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. ‘पेटा’ने जारी केलेल्या एका निवेदनात, या ‘बैल-मुक्त’ प्रमाणपत्राचे वर्णन एक अनोखा उपक्रम असे करण्यात आले



आहे. हा उपक्रम अशा साखर कारखान्यांच्या प्रयत्नांचे कौतुक करतो, ज्यांनी आपल्या सर्व कामकाजातून बैलांच्या श्रमाचा वापर पूर्णपणे वगळला आहे. या निवेदनानुसार, हा उपक्रम असा संकेत देतो की, भारतातील तसेच परदेशातील उसाचे खरेदीदार आता अशा पुरवठा साखळ्यांना प्राधान्य देत आहेत, ज्या पूर्णपणे यांत्रिक (मशिन-आधारित) आहेत आणि ज्यामध्ये प्राण्यांचा वापर केला जात नाही. या बदलामागील मुख्य उद्देश प्राण्यांचे कल्याण हाच आहे.

# तृणमूल काँग्रेसमधील फुटीवर शिक्कामोर्तब

## बंडखोर आमदारांची संख्या ५८, ऋतब्रत बॅनर्जी यांना पाठिंबा

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेसमधील अंतर्गत बंडखोरीने बुधवारी एक अत्यंत नाट्यमय आणि निर्णायक वळण घेतले. पक्षातून हकालपट्टी करण्यात आलेले आमदार ऋतब्रत बॅनर्जी यांना टीएमसीच्या ५८ बंडखोर आमदारांनी विधिमंडळ पक्षनेते म्हणून पाठिंबा दिला आहे. या आमदारांनी आपल्या समर्थनाचे पत्र विधानसभा अध्यक्ष रथींद्र बोस यांच्याकडे सुपूर्द करून अधिकृत पक्ष आपणच असल्याचा दावा ठोकला आहे.

बंडखोर गटाने विधानसभेतील आपल्या नवीन नेतृत्वाची घोषणाही केली आहे. यामध्ये ऋतब्रत बॅनर्जी यांची विधिमंडळ पक्षनेतेपदी, तर जावेद खान, संदीपन साहा आणि श्युली साहा यांची उपनेतेपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच रघुनाथगंजचे



आमदार अखरु झमान यांच्याकडे मुख्य प्रतोद पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. पक्षांतर बंदी कायद्यानुसार विधानसभेत अपात्रतेची कारवाई टाळण्यासाठी मूळ पक्षाच्या एकूण आमदार संख्येपैकी किमान दोन-तृतीयांश आमदारांचा पाठिंबा असणे बंधनकारक आहे. तृणमलूमध्ये एकूण आमदार संख्या ८० असून अपात्रता टाळण्यासाठी आवश्यक संख्या ५४ आहे. बंडखोर गटाने ५४ चा आकडा पार करत ५८ आमदारांचे संख्याबळ दाखवले असल्याने, त्यांचा दावा जर विधानसभा अध्यक्षांनी स्वीकारला, तर सभागृहात त्यांना स्वतंत्र गट म्हणून मान्यता मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### मुख्यमंत्र्यांच्या बैठकीमध्ये ममतांचे कट्टर समर्थक

असलेल्या टीएमसीमधील अंतर्गत संघर्ष अधिकच चव्हाट्यावर आला आहे. एकीकडे टीएमसीचा विधिमंडळ पक्ष अभूतपूर्व फाटाफुटीच्या उंबरठ्यावर असताना, दुसरीकडे ममता बॅनर्जीचे जुने निष्ठावंत मानले जाणारे आमदार नयना बंडोपाध्याय, कोलकाताचे महापौर फिरहाद हकीम, अशोक देब आणि कुणाल घोष यांनी नवान्न (सचिवालय) येथे झालेल्या या प्रशासकीय बैठकीला हजेरी लावली.

### ममतांना नव्हे, अभिषेकला विरोध

या संपूर्ण घडामोडीत एक विशेष राजकीय संकेत पाहायला मिळाला. विधानसभा अध्यक्षांना दिलेल्या पत्रात बंडखोरांनी ममता बॅनर्जी यांचा उल्लेख 'पक्षाच्या अध्यक्षा' असाच केला आहे. याचा अर्थ, बंडखोरांचे हे युद्ध ममता बॅनर्जी यांच्या विरोधात नसून, सध्याच्या विधिमंडळ पक्षाच्या नेतृत्वाविरुद्ध आहे, असे दाखवण्याचा हा प्रयत्न आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बंडखोर आमदारांनी स्पष्ट केले आहे की, विधिमंडळ पक्षाच्या कामकाजात त्यांना अभिषेक बॅनर्जी यांचा हस्तक्षेप आणि हुकूमशाही मान्य नाही. या बैठकीला उपस्थित असलेला एकही आमदार मंगळवारी कोलकाता येथे ममता बॅनर्जी यांनी पुकारलेल्या धरणे आंदोलनात सामील झाला नव्हता. दुसरीकडे, ममता बॅनर्जींचे निष्ठावंत मानले जाणारे शोभनदेव चट्टोपाध्याय, नयना बंडोपाध्याय, मदन मित्रा आणि कुणाल घोष यांसारख्या नेत्यांनी बंडखोरांच्या या बैठकीकडे पूर्णपणे पाठ फिरवली.

# नऊ वर्षांपासून दुकान नोंदणी शुल्क बंद

● मुंबई, राकेश गायकवाड :

उत्पन्नाचे नवीन स्रोताचा शोध घेत असताना दुकानांचे नोंदणी व नूतनीकरण शुल्क तसेच कचरा निर्मूलन आकाराची वसुली २०१७ पासून बंद असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे गेल्या नऊ वर्षांत तब्बल ३०० ते ५०० कोटी रुपयांच्या महसुलाला मुकावे लागल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. एकेकाळी याच शुल्कातून दरवर्षी ६० ते ८० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळत असताना प्रशासनाच्या धोरणात्मक निर्णयामुळे महसुलाचा हा मोठा स्रोतच बंद पडल्याचे विधी समितीने निदर्शनाला आणले आहे.



दुकाने व आस्थापना विभागाच्या कामकाजाचा आढावा घेताना अनेक गंभीर त्रुटी उघड झाल्या आहेत. लाखो आस्थापनांची नोंदणी असताना विभागात मंजूर १२७ निरीक्षकांपैकी केवळ ५७ कर्मचारी कार्यरत असल्याने प्रत्यक्ष तपासणी आणि अंमलबजावणीवर मोठा परिणाम होत आहे. त्यातच काही कर्मचाऱ्यांची अन्य कामांसाठी नियुक्ती होत असल्याने यंत्रणेवर

**पालिकेच्या तिजोरीला ५०० कोटींचा फटका!**

ताण येतो.


### प्रोव्हिजनल सर्टिफिकेटची शिफारस

विधी समितीने आता बोगस नोंदणी रोखण्यासाठी आधार-संलग्न ओटीपी पडताळणी प्रणाली आणि ‘प्रोव्हिजनल सर्टिफिकेट’ची संकल्पना लागू करण्याची शिफारस केली आहे तसेच विभागातील त्रुटी दूर करण्यासाठी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली तातडीची संयुक्त बैठक बोलवण्याची मागणी विधी समिती अध्यक्षा दीक्षा कारकर यांनी केली आहे.

# लांजा येथे घरात घुसून बिबट्याचा हल्ला

● रत्नागिरी, आकांक्षा नार्वेकर :

लांजा तालुक्यातील बेनी बुद्रुक येथील कुसुममळेवाडीत बुधवारी रात्री बिबट्याने थेट घरात घुसून केलेल्या हल्ल्यात ५२ वर्षीय व्यक्तीसह मदतीसाठी धावलेल्या १९ वर्षीय युवकाला जखमी केले. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून वनविभागाने घटनास्थळी पाहणी करून बिबट्याच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यास सुरुवात केली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी रात्री सुमारे सव्वानऊच्या सुमारास कुसुममळेवाडीतील एका घरात पाठीमागील बाजूने बिबट्या शिरला. घरातील सदस्यांना काही समजण्यापूर्वीच त्याने घरातील ५२ वर्षीय व्यक्तीवर झडप घालत हल्ला केला. अचानक झालेल्या या प्रकारामुळे घरात एकच गोंधळ उडाला. हल्ल्यातील व्यक्तीने मदतीसाठी आरडाओरडा केल्यानंतर शेजारी राहणारा १९ वर्षीय युवक तातडीने मदतीला धावला. मात्र, आक्रमक झालेल्या बिबट्याने त्याच्यावरही हल्ला चढवला. या घटनेत दोघेही जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

दरम्यान, बिबट्याने थेट वस्तीत आणि घरात घुसून हल्ला केल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. रात्रीच्या वेळी घराबाहेर पडण्याबाबत नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत असून वनविभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी परिसराची पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला. बिबट्याच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात येत असून त्याला जेरबंद करण्यासाठी पिंजरा लावण्याबाबतही हालचाली सुरू असल्याचे समजते.


# तीन ब्रेन-डेड रुग्णांच्या कुटुंबीयांकडून अवयवदान

## अनेकांना मिळाले जीवनदान; मुंबईत सामाजिक जाणिवेचे दर्शन

● मुंबई, सुचित शिंदे :

मुंबई महानगर प्रदेशात (एमएमआर) अवयवदानाबाबत वाढती जनजागृती गेल्या आठवड्यात पुन्हा एकदा अधोरेखित झाली. तीन ‘ब्रेन-डेड’ (मृत्युमुखी पडलेल्या) रुग्णांच्या कुटुंबीयांनी पुढे येत या उदात्त कार्याला पाठिंबा दिला. त्यांच्या अवयवदानामुळे चार रुग्णांना नवीन जीवन मिळाले आहे. दान केलेल्या अवयवांमध्ये यकृत, मूत्रपिंड, नेत्रपटल आणि अस्थींचा समावेश आहे.

‘झोनल ट्रान्सप्लांट कोऑर्डिनेशन सेंटर’ने (झेडटीसीसी) दिलेल्या माहितीनुसार, २९ मे रोजी ठाण्यातील ज्युपिटर हॉस्पिटलमध्ये ४३ वर्षीय मेहुल करारीया यांना






‘ब्रेन-डेड’ घोषित करण्यात आले. त्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांनी अवयवदानाचा निर्णय घेतला. त्यांचे यकृत, दोन्ही मूत्रपिंडे दान करण्यात आली तर नेत्रपटल तसेच अस्थीही रुग्णांसाठी पाठवण्यात आल्या.

### ब्रेन स्ट्रोकने मृत्यू

मेहुल यांना कोणताही पूर्वआजार नव्हता. २९ मे च्या रात्री त्यांची प्रकृती अचानक बिघडली आणि त्यांना अर्धांगवायूची लक्षणे दिसू लागली. चार वेगवेगळ्या रुग्णालयांमध्ये केलेल्या वैद्यकीय तपासणीत त्यांना ब्रेन स्ट्रोक आल्याचे स्पष्ट झाले.

### वर्षभरातील अठ्ठाविसावे अवयवदान

‘झेडटीसीसी’ मुंबईच्या माहितीनुसार, गेल्या आठवड्यात झालेल्या या तीन अवयवदानांमुळे मुंबई क्षेत्रात वर्ष २०२६ मधील मरणोत्तर अवयवदानाची एकूण संख्या २८ वर पोहोचली आहे.

### महिलेने यकृत, नेत्रपटलाचे केले दान

मुलुंडच्या फोर्टिस हॉस्पिटलमध्येच एका ६९ वर्षीय महिलेला ब्रेन-डेड घोषित केल्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांच्या संमतीने त्यांचे यकृत आणि नेत्रपटल दान करण्यात आले. गोव्यात राहणाऱ्या त्यांच्या मुलाने, मुंबईतील कांजूरमार्ग येथे राहणाऱ्या आपल्या भावाच्या पाठिंब्याने या अवयवदानाला परवानगी दिली.

### अवयवदान मोहिमेला पाठिंबा

मेहुल हे भानुशाली समाजाचे होते, ज्या समाजाला अवयवदान मोहिमेला पाठिंबा देण्याचा मोठा इतिहास आहे. समाजातील ज्येष्ठ सदस्य आणि शास्त्रज्ञ डॉ. जयंती दामा म्हणाले की, शक्य असलेले सर्व १३ अवयव आणि ऊती दान करण्याची कुटुंबीयांची तयारी होती. डॉ. दामा यांनी सांगितले, ‘मेहुल स्वत: अवयवदानाबाबत जनजागृती करण्यात सक्रिय होते. त्यांच्या या उदात्त कार्याने अवयवदानाच्या मोहिमेप्रती समाजाची कटिबद्धता पुन्हा एकदा दृढ केली आहे.’

### मुलुंडमधील वृद्धाचे अवयवदान


मुलुंड येथील फोर्टिस हॉस्पिटलमध्ये ८५ वर्षांच्या वृद्धाला ब्रेन-डेड घोषित केल्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांनी अवयवदानाला संमती दिली. त्यांचे यकृत एका गरजू रुग्णाला देण्यात आले. त्यांच्या पत्नी आणि ठाण्यात केंद्र सरकारी कर्मचारी असलेल्या दोन मुलांनी हे अवयवदान करण्याचा निर्णय घेतला.

# हिंजवडीत ड्रग्ज नेटवर्क उद्ध्वस्त

● पुणे, प्रतिनिधी :

पुण्यातील 'आयटी हब' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हिंजवडी परिसरात अमली पदार्थांविरोधात पोलिसांनी मोठी कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी तब्बल दहा किलो अफूच्या बोंडांचा चुरा आणि बोंडं जप्त केलीत. या कारवाईत पुष्पेन्द्र सिंग किरपाराम या आरोपीला अटक केली असून, तो मूळ राजस्थानचा रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे. आयटी कंपन्यांचं प्रमुख केंद्र असलेल्या हिंजवडीत अशा प्रकारे अमली पदार्थांची विक्री करण्याचा प्रयत्न होत असल्यामुळं पुन्हा एकदा परिसरातील वाढत्या ड्रग्ज नेटवर्कचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.हिंजवडी पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई केली. संबंधित आरोपी हा अफूच्या बोंडांची विक्री करण्यासाठी परिसरात येणार असल्याची माहिती पोलिसांना खबऱ्यामार्फत मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचत संशयितावर लक्ष ठेवत योग्य वेळी कारवाई करून त्याला ताब्यात घेतलं. तपासादरम्यान आरोपीकडून मोठ्या प्रमाणात अफूच्या बोंडांचा चुरा आणि बोंडं हस्तगत करण्यात आली. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाचं वजन सुमारे दहा किलो आहे, अशी माहिती पोलिसांनी

**१० किलो अफूसह राजस्थानचा तस्कर जेरबंद**



दिली .अफूच्या बोंडांचा चुरा सिगारेटमध्ये मिसळून किंवा चहा, कॉफीमध्ये टाकून त्याचं सेवन केलं जात असल्याचं समोर आलं आहे. यामुळं नशा लवकर चढते आणि त्याचा वापर विशेषत: तरुणांमध्ये वाढत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. आयटी क्षेत्रात काम करणाऱ्या तरुणांपर्यंतही अशा प्रकारचे अमली पदार्थ पोहोचत असल्याची शक्यता पोलिसांकडून वर्तवली जात आहे. या प्रकरणी अटक केलेल्या आरोपीचा पूर्वेतिहास तपासण्याचं काम सुरू असून, त्याच्यावर यापूर्वी अशाच प्रकारचे गुन्हे दाखल आहेत का? याचा शोध घेतला जात आहे. तसंच या प्रकरणाचा संबंध इतर राज्यांमधील अमली पदार्थ तस्करीशी आहे का? याचाही तपास सुरू आहे.